१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवा काळ

• पुणे, मंगळवार १२ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२३२, पाने-८, किंमत: ₹ ७ NAVAKAL

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 232 Marathi - Daily - Pune, 12 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in



## विजय आणि स्टॅलिन यांची भेट

**चेन्नई** - तामिळनाडूच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर टीव्हीकेचे प्रमुख विजय यांनी माजी मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांची भेट घेतली. यावेळी स्टॅलिन यांचे पुत्र उदयनिधी हेही उपस्थित होते. या भेटीत विजय आणि स्टॅलिन यांनी एकमेकांना मिठी मारली. यावरून तामिळनाडूच्या राजकारणात नवी चर्चा सुरू झाली आहे. या भेटीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. विशेष म्हणजे द्रमुकचा सहकारी पक्ष असलेल्या काँग्रेसने निवडणूक झाल्यानंतर टीव्हीकेला पाठिंबा दिल्याने दोन्ही पक्षांचे संबंध बिघडलेले आहेत.

# पंतप्रधानांच्या सल्ल्यानंतर पाच उद्योगांत भूकंप
# सोने बाजाराला मोठा फटका! १ कोटी रोजगार जाणार



पंतप्रधानांच्या आवाहनानंतर दुसऱ्या दिवशी पेट्रोलपंपावर दुचाकी व वाहन चालकांनी गर्दी केली.

**आखाती युद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीशी सामना करण्यासाठी परकीय चलन वाचविण्याकरिता पंतप्रधान मोदी यांनी काल सामान्य जणांवर मोठी जबाबदारीच टाकली. एक वर्ष सोने घेऊ नका, मेट्रोने प्रवास करा, वर्क फ्रॉम होम करा, परदेशी प्रवासाला जाऊ नका, रासायनिक खते वापरू नका, स्वयंपाकात तेलाचा वापर कमी करा, पेट्रोल-डिझेल कमीत कमी वापरा, असा सल्ला त्यांनी काल दिला आणि आज सराफा बाजारापासून सामान्य माणसांपर्यंत सर्वांनी या सल्ल्यावर संताप व्यक्त केला. सराफा बाजार तर आज सकाळीच कोसळला. एक वर्ष सोने खरेदी केले नाही तर एक कोटी कामगारांचा रोजगार जाईल, अशी तक्रार सोने व्यापाऱ्यांनी केली.**

■ नवी दिल्ली


**ऑल** इंडिया जेम्स अ‍ॅण्ड ज्वेलरी काऊंन्सिलचे अध्यक्ष राजेश रोकडे म्हणाले की, सोने विकत न घेण्याच्या आवाहनाचा दुरगामी विपरीत परिणाम होऊ शकतो. सराफा बाजारावर त्याचा विपरित परिणाम होईल. जेडीपीमध्ये सराफा उद्योगाचे ६० टक्के योगदान आहे. त्यावरही मोठा परिणाम होईल. सराफा बाजाराप्रमाणेच परदेशी प्रवासाला घेऊन जाणाऱ्या पर्यटन कंपन्यांवरही मोठा परिणाम झाला. या सर्व कंपन्याचे शेअर आज कोसळले. त्यामुळे या उद्योगाशी संबंधित सर्व भडकले होते. सामान्य माणसांनी आज सोशल मीडियावर फार मोठ्या प्रमाणात मीम्स आणि कार्टून टाकून आपला संताप व्यक्त केला. आम्हाला दुचाकी आणि चारचाकी चालवू नका, असा सल्ला देण्यापेक्षा राजकारण्यांनी त्यांचे दौरे आणि रोडशो बंद करावेत. लग्न समारंभासाठी सुद्धा हेलिकॉप्टरने जाणाऱ्या राजकारण्यांनी इंधन बचतीसाठी लोकलने प्रवास करावा, सामान्य माणसाला मेट्रोचे भाडे परवडत नाही हे सुद्धा या राजकारण्यांना माहिती नाही, आम्ही मेट्रोने जावे असे वाटत असेल तर मेट्रोचा दर कमी करावा, असाही सल्ला अनेकांनी दिला. दरवेळी सामान्य माणसानेच त्याग करायचा, देशभक्तीची ग्वाही देऊन सामान्य माणसालाच वेठीस धरायचे हे योग्य नाही, अशी प्रतिक्रिया अनेकांनी दिली. स्वयंपाकात तेलाचा वापर कमी करावा या सल्ल्यावर गृहिणींनी संताप व्यक्त केला. खाद्यतेलाच्या किमती आधीच भडकल्या असल्याने आम्ही आधीच तेलाचा वापर कमी केला आहे, आता बिनतेलाच्या भाज्या करायच्या का? असा सवाल या गृहिणींनी विचारला.

मोदींनी रासायनिक खते न वापरता शेतात सेंद्रीय खते वापरावीत, असा सल्ला दिला आहे. याचे पान ६ वर

## गदिमांचे घर 'पंचवटी' पाडणार
## नातवाची नातेवाईकांविरुद्ध तक्रार



**महाकाव्य गीत रामायण ज्या निवासात लिहिले ते कवी दिवंगत ग.दि. माडगुळकर यांचे पुण्यातील ऐतिहासिक निवासस्थान पंचवटी त्यांच्याच काही नातेवाईकांनी बिल्डरला विकण्याचा घाट घातला आहे, असा दावा गदिमांचे नातू सुमित्र माडगुळकर यांनी आज प्रसिद्धी माध्यमांसमोर बोलताना केला. जीव गेला तरी गदिमांचा वारसा सांगणारी ही ऐतिहासिक वास्तु आपण विकू देणार नाही. हिंमत असेल तर पंचवटीला हात लावून दाखवा, असे आव्हान सुमित्र यांनी संबंधितांना दिले आहे.**



■ पुणे

**गदिमांनी** हयात असताना म्हटले होते की, जोपर्यंत माझे घर पंचवटी आहे तोपर्यंत माझे अस्तित्व या जगात राहील. तिच पवित्र वास्तू पंचवटी पाडावी, बिल्डरला विकावी यासाठी जवळच्या नातेवाईकांकडून आमच्यावर दबाव टाकला जात आहे. या नातेवाईकांमध्ये असे लोक आहेत ज्यांनी पंचवटीवर, गदिमांवर मोठ-मोठी पुस्तके लिहिली आहेत. माझ्यावर गेले काही महिने पंचवटी विकण्यासाठी दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे. मी जीवात जीव असेपर्यंत विरोध करत राहीन. केवळ पैशांच्या लोभापोटी हे लोक गदिमांची पवित्र वास्तु पाडू किंवा विकू देणार नाही' असे सुमित्र माडगुळकर म्हणाले.

पंचवटी पाडण्यास आपण विरोध करत असल्याने संबंधित लोकांनी आपली आणि आपल्या कुटुंबियांची बदनामी करण्याचे प्रयत्न चालवले आहेत. कुटुंबातील ज्या स्त्रिया संसारात सुखी नाहीत त्यांनी पान ७ वर

## थोडक्यात...

### नाणार-सागवेतील बॉक्साईट उत्खननची जनसुनावणी रद्द

**रत्नागिरी** - रत्नागिरीतील राजापूर तालुक्यातील नाणार आणि सागवे गावांमध्ये प्रस्तावित बॉक्साईट उत्खनन प्रकल्पासाठी होणारी जनसुनावणी अखेर रद्द करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत उदय सामंत यांनी हा निर्णय जाहीर केला. बैठकीला स्थानिक आमदार किरण सामंत उपस्थित होते. या प्रकल्पासाठी २० मे आणि २६ मे रोजी जनसुनावणी होणार होती. मात्र स्थानिक ग्रामस्थांनी या बॉक्साईट उत्खननाला तीव्र विरोध केला होता. पर्यावरणीय आणि स्थानिक उपजीविकेवर होणाऱ्या परिणामांचा मुद्दा उपस्थित करत नागरिकांनी आंदोलनाची भूमिका घेतली होती. 'विनाशकारी बॉक्साईट खाण प्रकल्प विरोधी संघर्ष समिती'नेही आक्रमक पवित्रा घेत जनसुनावणी रद्द करण्याची मागणी केली होती. जनसुनावणी न झाल्यास ती उधळून लावण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला होता. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने संभाव्य तणाव टाळण्यासाठी जनसुनावणी रद्द करण्याचा निर्णय घेतला.

### मुंबईत १५ मेपासून १० टक्के पाणीकपात

**मुंबई** - मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही जलाशयांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याने मुंबई महापालिकेने १५ मे २०२६ पासून १० टक्के पाणीकपात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या जलाशयांमध्ये केवळ २३.५२ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असून वाढते तापमान आणि बाष्पीभवनामुळे प्रशासन सतर्क झाले आहे. महापालिकेच्या माहितीनुसार, मुंबईसाठी अतिरिक्त पाणी राखीव साठ्यातून उपलब्ध होणार असले तरी खबरदारीचा उपाय म्हणून ही कपात लागू केली जात आहे. समाधानकारक पाऊस पडून जलाशयांतील पातळी वाढेपर्यंत ही कपात कायम राहणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन पालिकेने केले आहे.

## अमेरिकेने इराणचा प्रस्ताव फेटाळला
## आखाती युद्ध थांबण्याची शक्यता नाहीच

■ वॉशिंग्टन

**मध्य** पूर्वेतील युद्ध थांबण्यासाठी काल इराणने पाकिस्तानमार्फत अमेरिकेला पाठवलेला नवा प्रस्ताव राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फेटाळून लावला. ट्रुथ सोशलवर पोस्ट करून ट्रम्प यांनी आज ही माहिती दिली. इराणच्या प्रतिनिधींचा प्रस्ताव वाचला. मला तो अजिबात आवडला नाही. तो स्वीकारला जाऊ शकत नाही, असे ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले.

अमेरिकेने गेल्या आठवड्यात इराणला युद्धबंदीचा १४ कलमी प्रस्ताव पाठवला होता. त्यामध्ये इराणने किमान १२ वर्षांसाठी अणू कार्यक्रम



थांबवावा आणि त्यांच्याकडे असलेले ४४० किलो समृद्ध युरेनियम अमेरिकेकडे सोपवावे, अशी मुख्य अट अमेरिकेने घातली होती. इराणने ही अट मान्य केल्यास अमेरिका इराणवर घातलेले निर्बंध शिथिल करेल, इराणची गोठवलेली अब्जावधी डॉलरची मालमत्ता मुक्त करेल, तसेच इराणच्या बंदरांवरील नाकेबंदी

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

हटवेल, असे अमेरिकेने म्हटले होते. इराणने अमेरिकेच्या या प्रस्तावाला उत्तर म्हणून रविवारी नवा प्रस्ताव दिला होता. या प्रस्तावामध्ये युद्ध तत्काळ थांबवणे, पर्शियाचे आखात आणि होर्मुजच्या सामुद्रधुनीमध्ये पान ७ वर

## निदाला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी
## मतीन पटेलचे नगरसेवकपद धोक्यात

■ नाशिक

**टीसीएस** धर्मांतर आणि लैंगिक अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खान हिला नाशिकरोड न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तिची पाच दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर आज तिला न्यायालयात हजर करण्यात आले. दरम्यान, तिला आश्रय देणारा एमआयएम नगरसेवक मतीन पटेल याचे पद रद्द करण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे छत्रपती संभाजीनगरच्या महापौरांनी सांगितले.

निदा खान गरोदर असल्याने तिला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर केले जाईल, अशी चर्चा होती. मात्र, तिला प्रत्यक्ष न्यायालयात आणण्यात आले. सुनावणीदरम्यान पोलिसांनी वाढीव पोलीस कोठडीसाठी विशेष आग्रह धरला नाही. त्यामुळे न्यायालयाने तिला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावत तिची नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्याचे आदेश दिले.

चौकशीदरम्यान अनेक धक्कादायक बाबी स्पष्ट झाल्याचा दावा तपास यंत्रणांनी केला. तपासात निदा खान पीडित पान ७ वर

## टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा
## नोव्हेंबर महिन्यात निवृत्त होणार

■ मुंबई

**टाटा** समूहातील अनेक कंपन्यांचे अध्यक्षपद भूषवणारे नोएल टाटा आगामी नोव्हेंबर महिन्यांत वयाची सत्तरी गाठत आहेत. टाटा समूहात अशी परंपरा राहिली आहे की, कार्यकारी पदावरील व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षी तर संचालक पदावरील सत्तराव्या वर्षी निवृत्ती स्वीकारून स्वतःच दूर होतात. त्या परंपरेचे पालन करत नोएल टाटा निवृत्ती स्वीकारणार असल्याने उद्योग जगतात त्यांच्या उत्तराधिकाऱ्याबद्दल चर्चा सुरू झाली आहे.


टाटा उद्योग समूह हा देशातील सर्वात मोठ्या आणि प्रतिष्ठित समूहांपैकी एक आहे. त्यामुळे या समूहातील नेतृत्वबदलाची उद्योग क्षेत्रात गांभीर्याने दखल घेतली जाते. नोएल टाटांचा उत्तराधिकारी समूहातील कंपन्यांच्या आगामी वाटचाल सुरळीत सुरू ठेवेल की नाही, याची चिंता कंपनीच्या भागधारकांना आणि शेअर बाजारात व्यवहार करणाऱ्या व्यावसायिकांना लागून राहते. टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी नोएल टाटा यांची २०२४ मध्ये निवड करण्यात आली. कार्यकारी पद आणि संचालक पदासाठी वय हा निवृत्तीचा निकष असला तरी टाटा ट्रस्टच्या अध्यक्षासाठी वय हा निवृत्तीचा निकष नाही. सध्या नोएल टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन, टाटा इंटरनॅशनल, ट्रेंट आणि व्होल्टासचे बिगर कार्यकारी संचालक आहेत.

## मोजतबा खामेनी बंकरमध्ये लपून सत्ता चालवत आहे? नेतन्याहूंचा दावा

■ तेल अवीव

**इस्त्रायलचे** पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी एका मुलाखतीत इराणच्या नेतृत्वाबाबत मोठा दावा करत, इराणचे नवे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी जिवंत असल्याचे म्हटले. मात्र,त्यांची सत्तेवरील पकड त्यांचे वडील अली खामेनेई यांच्याइतकी मजबूत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

नेतन्याहू म्हणाले की, मोजतबा खामेनी सध्या एखाद्या बंकरमध्ये किंवा गुप्त ठिकाणी लपून आहेत. तिथूनच सत्तेचे नियंत्रण सांभाळण्याचा प्रयत्न करत आहेत. १९७९ च्या इस्लामिक क्रांतीनंतर इराण आज सर्वात कमकुवत अवस्थेत आहे. शासनामध्ये अंतर्गत मतभेद



वाढले असून विविध गटांमध्ये संघर्ष सुरू आहेत.इराणी शासनाला सर्वाधिक भीती स्वतः च्या जनतेची आहे. इराणमधील काही गट संघर्ष सुरू ठेवण्याच्या बाजूने आहेत, तर काहींना भीती आहे की, सततच्या संघर्षामुळे अर्थव्यवस्था कोलमडून पडेल व जनता रस्त्यावर उतरू शकते. ते पुढे म्हणाले की, इस्त्रायलने इराणमधील पेट्रोकेमिकल प्लांट, स्टील प्लांट आणि क्षेपणास्त्र निर्मितीशी संबंधित अनेक ठिकाणांना लक्ष्य केले. त्यामुळे इराणच्या अर्थव्यवस्थेला आणि लष्करी ताकदीला मोठा फटका बसला. इराणविरोधातील संघर्ष अद्याप संपलेला नाही. इराणकडे अजूनही समृद्ध युरेनियमचा साठा आहे, अनेक अणू केंद्रे सक्रिय आहेत आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कार्यक्रम पूर्णपणे नष्ट झाले नाही.

## जामिनाचे अर्ज वेगाने निकाली काढा
## सुप्रीम कोर्टाचे हायकोर्टांना निर्देश

■ नवी दिल्ली

**आरोपींच्या** कायदेशीर हक्कांना विशेष महत्त्व देत जामिनासाठीचे अर्ज वेगाने निकाली काढण्याचे आदेश आज सर्वोच्च न्यायालयाने सर्व उच्च न्यायालयांना दिले.

सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. ज्यॉयमल्ल्या बागची यांच्या खंडपीठाने आरोपींच्या जामिनाच्या अर्जांचा वेगाने निपटारा करण्यासाठी उच्च न्यायालयाने अनेक सूचना केल्या. उच्च न्यायालये आणि तपास यंत्रणांनी आरोपींचे जामीन अर्ज वेगाने निकाली कसे काढता येतील यासाठी एकमेकांशी ताळमेळ राखून काम करावे आणि आरोपीच्या कायदेशीर हक्काची पायमल्ली न होता जामीन अर्जावर विनाविलंब कार्यवाही करावी,असे न्यायालयाने सांगितले.

आरोपींचे जामीन अर्ज निकाली काढण्यासाठी उच्च न्यायालयांनी एक कालमर्यादा ठेवावी आणि किरकोळ कारणांवरून सुनावणी वारंवार पुढे ढकलण्याची केंद्र किंवा राज्य सरकारची मागणी मान्य करू नये, असे निर्देशही न्यायालयाने दिले. विविध कारणांनी जामिनाच्या अर्जांवरील सुनावणी पुढे ढकलण्याची केंद्र किंवा राज्य सरकारची मागणी अमान्य करताना न्यायालयाने एक कार्यप्रणाली निश्चित करावी आणि न्यायालयाचे कर्तव्य प्रत्येकाला समान न्याय देण्याचे आहे, याची जाणीव सरकारला करू द्यावी, असे न्यायालयाने सांगितले.

**नसरापूर येथील चिमुकलीवरील अत्याचार आणि हत्या प्रकरणाची सुनावणी प्रभावी आणि जलदगतीने पार पाडण्यासाठी राज्य सरकारने ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. अजय मिसर यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे.**

## नसरापूर प्रकरणात अ‍ॅड.अजय मिसर
## सरकारी वकील म्हणून नियुक्त

■ पुणे

**या प्रकरणात** आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी पीडितेच्या कुटुंबियांकडून सातत्याने केली जात आहे. यासाठी पीडितेच्या वडिलांनी पुण्यात मोर्चाही काढला होता. या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी तातडीने पावले उचलत अनुभवी वकिलाची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार राज्यपालांच्या स्वाक्षरीने यासंदर्भातील अधिकृत अध्यादेश जारी करण्यात आला आहे. या निर्णयामुळे प्रकरणाची सुनावणी अधिक प्रभावीपणे आणि जलदगतीने पार पडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पीडितेच्या कुटुंबियांनी सुरुवातीला प्रसिद्ध सरकारी वकील उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची मागणी केली होती. त्यावेळी पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी योग्य आणि सक्षम वकील देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार अ‍ॅड. अजय मिसर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### कोण आहेत अ‍ॅड. अजय मिसर?

अ‍ॅड. अजय मिसर हे महाराष्ट्रातील अनुभवी आणि कर्तबगार सरकारी वकील आहेत. २०१६ पासून ते नाशिकचे जिल्हा सरकारी वकील म्हणून कार्यरत असून अनेक गाजलेल्या गुन्हे



आणि दहशतवादाशी संबंधित प्रकरणांत त्यांनी प्रभावीपणे बाजू मांडली आहे. कुरव्यात गँगस्टर छोटा राजनचा हस्तक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रवि पूजारी याच्याविरोधातील प्रकरणांमध्येही त्यांनी काम केले आहे. तसेच मुंबई सारवळी बॉम्बस्फोट, मालेगाव बॉम्बस्फोट यांसारख्या दहशतवादी प्रकरणांशी संबंधित खटल्यांत त्यांनी सरकारी बाजू भक्कमपणे मांडली.

## २०० कोटींच्या मनी लाँडरिंगमध्ये
## अभिनेत्री जॅकलीनही सहभागी आहे

■ नवी दिल्ली

**२०० कोटी** रुपयांच्या मनी लाँडरिंग खटल्यात माफीचा साक्षीदार होण्याची अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिसने केली होती. मात्र आज अंमलबजावणी संचलनालयाने (ईडी) तिच्या अर्जाला जोरदार विरोध केला. जॅकलीन स्वतः या गैरव्यवहारात



सामील असल्याने तिला माफीचा साक्षीदार करू नये, अशी भूमिका ईडीने घेतली.

या खटल्यात मुख्य आरोपी असलेला सुकेश चंद्रशेखर हा जॅकलीनचा प्रियकर आहे. त्याच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीबद्दल कल्पना असूनदेखील जॅकलीनने त्याच्याकडून महागड्या भेटवस्तू स्वीकारल्या आणि ती सहभागी होती, असा ईडीचा आरोप आहे.

पतियाळा हाऊस कोर्टात अतिरिक्त सत्र न्यायाधीश प्रशांत शर्मा यांच्या न्यायासनासमोर आज जॅकलीनने माफीचा साक्षीदार करून घेण्यासाठी केलेल्या अर्जावर सुनावणी झाली. त्याप्रसंगी जॅकलीनची या गैरव्यवहारात पान ७ वर

## भाजपाचे काही उमेदवार
## 'एसआयआर'मुळे जिंकले

■ नवी दिल्ली

### तृणमूलचा सुप्रीम कोर्टात दावा

**पश्चिम** बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाचे काही उमेदवार केवळ मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरनिरीक्षणात मतदारांची नावे वगळल्यामुळे जिंकले, असा दावा करणारी याचिका तृणमूल काँग्रेसच्या वतीने आज सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे.

विधानसभा निवडणुकीत भाजपाने अनेक गैरमार्गांचा वापर केला असा आरोप तृणमूल काँग्रेसने सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेमध्ये केला आहे. या याचिकेवर सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. ज्यॉयमल्ल्या बागची यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी झाली. त्याप्रसंगी तृणमूल काँग्रेसचे नेते आणि ज्येष्ठ विधिज्ञ कल्याण बॅनर्जी यांनी न्यायालयासमोर ३१ पान ७ वर

# न्यायालयीन कोठडीत असलेल्या कुटेच्या फॅक्टरीसमोर अघोरी पूजा

बीड

**बीड** शहरातील एमआयडीसी भागात असलेल्या कुटे उद्योग समूहाच्या ऑइल फॅक्टरीसमोर अघोरी तंत्र पूजा केल्याचा प्रकार उघडकीस आला. न्यायालयीन कोठडीत असलेले सुरेश कुटे यांच्या फॅक्टरीच्या गेटसमोर कापलेले लिंबू व रक्तासारखे थारोळे आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

हा प्रकार काल उशिरा उघडकीस आला असून नेमका हे कृत्य कोणी केले आणि यामागचा उद्देश काय होता, याबाबत विविध चर्चा सुरू आहेत. फॅक्टरी परिसरात अशा प्रकारची अघोरी पूजा का करण्यात आली, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, सुरेश कुटे आणि त्यांची पत्नी अर्चना कुटे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. कुटे उद्योग समूहाचा तेल, दूध, पेंड तसेच कपड्यांच्या दुकानांपर्यंत विस्तार असलेला मोठा व्यवसाय राज्यभर पसरलेला होता. वितरकांचे जाळेही मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्यात आले होते. मात्र दीड वर्षापूर्वी या समूहावर प्राप्तिकर विभागाने छापा टाकल्यानंतर मोठी कारवाई सुरू झाली. त्यानंतर राज्यभरात सुमारे ८० गुन्हे दाखल झाले आहेत.

# नोएडातील बेपत्ता कामगारांचा शोध घ्या विविध कामगार संघटनांचे आंदोलन

लखनौ

**नोएडामधील** कामगार आणि कामगार नेत्यांच्या बेपत्ता होण्याच्या प्रकरणात तातडीने कारवाई करण्याच्या मागणीसाठी लखनौमध्ये विविध कामगार संघटनांनी आंदोलन छेडले. त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले. हे आंदोलन विविध ट्रेड युनियन आणि कामगार संघटनांनी आयोजित केले होते. अलीकडे नोएडामध्ये कामगार हक्कांसाठी झालेल्या आंदोलनानंतर काही कामगार बेपत्ता झाल्याचा आरोप करत प्रशासन स्पष्ट माहिती देण्यात अपयशी ठरत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

आंदोलकांनी घोषणाबाजी करत या प्रकरणाची पारदर्शक चौकशी करण्याची मागणी केली. अहवालानुसार, नोएडातील औद्योगिक आंदोलनांशी संबंधित काही कामगार संशयास्पद परिस्थितीत बेपत्ता झाल्याचा आरोप कामगार नेत्यांनी केला आहे. बेपत्ता कामगारांच्या कुटुंबियांनीही आंदोलनात सहभाग घेत प्रशासनाने त्यांच्या नातेवाईकांचा शोध घ्यावा, अशी मागणी केली. वेतन, नोकरीची सुरक्षा आणि कामगार हक्कांसाठी आवाज उठवणाऱ्या कामगारांना लक्ष्य केले जात असल्याचा आरोप विविध सामाजिक संघटना आणि कामगारांनी केला. कारवाई न झाल्यास आंदोलन उभारण्याचा इशाराही आंदोलकांनी दिला.

# द्वारका सर्कल-नाशिक रोड महामार्ग रुंदीकरणाला मंजुरी

नाशिक

**नाशिक** शहरातील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी द्वारका सर्कल ते नाशिक रोड (दत्तमंदिर) या ६.४ किमी मार्गाच्या रुंदीकरण प्रकल्पाला अंतिम मंजुरी मिळाली आहे. राज्य वित्त आयोग आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने या प्रकल्पाला हिरवा कंदील दिला आहे.

सुमारे २२० कोटी रुपयांच्या या प्रकल्पात रस्ता सहा पदरी करण्यात येणार आहे. दोन्ही बाजूंना सर्विस रोड उभारले जाणार आहेत. त्यामुळे शहरातील वाढती वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळा लक्षात घेता हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे. कामाला या महिन्याच्या अखेरीस सुरुवात होऊन मार्च २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पासाठी महापालिकेने पाठपुरावा केला होता. तसेच नितीन गडकरी यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर अंतिम मंजुरी मिळाली. हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० अंतर्गत आहे. नाशिक रोड रेल्वे स्थानक आणि सिन्नरकडे जाणाऱ्या वाहनांमुळे येथे नेहमीच मोठी वाहतूक असते. रुंदीकरणानंतर वाहतूककोंडी कमी होण्याची अपेक्षा आहे.

# जोगेश्वरीतील ट्रॉमा केअर हॉस्पिटलच्या डॉक्टरला धमकी



मुंबई

**जोगेश्वरी** येथील ट्रॉमा केअर हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेल्या एका डॉक्टरला जुन्या व्हिडीओच्या आधारे बदनामीची धमकी देत १५ लाख रुपयांची खंडणी मागण्यात आल्याचा प्रकार घडला.

एका महिला आणि तीन पुरुषांनी मिळून डॉक्टरला सतत फोन करून पैसे मागितले. जर पैसे दिले नाहीत तर संबंधित व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करून बदनामी करण्याची धमकी आरोपींकडून देण्यात आली होती, असा आरोप आहे. पीडित डॉक्टर हे हज पोर्टलचे नोडल अधिकारी म्हणूनही कार्यरत आहेत. या प्रकारामुळे मानसिक त्रास वाढल्यानंतर त्यांनी वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घेत जोगेश्वरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी ब्लॅकमेल आणि खंडणीचा गुन्हा नोंदवला असून प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. आरोपींना लवकरच अटक केली जाईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

# विरार-बोळींजमधील म्हाडाची घरे आरक्षणामुळे विक्रीविना धूळखात


मुंबई

**विरार**-बोळींज येथील म्हाडा कोकण गृहनिर्माण मंडळाची १०९३ घरे आरक्षणाच्या प्रवर्गात राखीव ठेवण्यात आली. मात्र या घरांकडे लाभार्थ्यांनी पाठ फिरविल्यामुळे ही घरे अनेक वर्षापासून विक्रीविना धूळखात पडून आहेत.

२०१४ साली म्हाडाने बोळींजमध्ये भव्य असा गृहनिर्माण प्रकल्प उभा केला. यामध्ये असलेली १०९३ घरे अत्यल्प, अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटासाठी आणि विशेषतः अनुसूचित जाती, जमातीच्या प्रवर्गासाठी आरक्षित आहेत. म्हाडाने आतापर्यंत ३ वेळा घरांची लॉटरी काढली होती. याला प्रतिसाद न मिळाल्याने म्हाडाने १०९३ आरक्षित घरे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेअंतर्गत ही घरे विक्री करण्याचा प्रयत्न केला. याकडे ही लाभार्थ्यांनी पाठ फिरविली. त्यामुळे आता ही घरे विक्री करण्याचे म्हाडासमोर आव्हान आहे. या संदर्भात म्हाडा कोकण मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. विशाल राठोड यांना विचारले असता ते म्हणाले, येथील आरक्षित प्रवर्गातील घरे खुल्या प्रवर्गात विक्री करण्याचा आमचा विचार आहे. पनवेल येथे म्हाडाकडून घरे बांधली जाणार आहेत. त्या ठिकाणी बोळींजमधील अनुसूचित जाती, जमातीसाठी आरक्षित असलेली घरे या बदल्यात पनवेलमध्ये बांधली जाणार आहेत.

# 'तुम तो ठहरे परदेसी'चे गीतकार जहीर आलम यांचे निधन

नागपूर



१९९० च्या दशकात संगीतप्रेमींच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या 'तुम तो ठहरे परदेसी' या सुपरहिट गीताचे गीतकार जहीर आलम यांचे नागपुरात निधन झाले. त्यांच्या निधनाने हिंदी संगीतविश्वातील महत्त्वाचा पण काळाच्या ओघात दुर्लक्षित राहिलेला आवाज कायमचा हरपला. जहीर आलम हे नागपूरमधील मोमीनपुरा भागातील एका साध्या घरात वास्तव्यास होते. या कवीचे आयुष्य मात्र संघर्ष, आर्थिक विवंचना आणि उपेक्षेत गेले. गेल्या काही वर्षांपासून ते सार्वजनिक चर्चांपासून आणि संगीतविश्वाच्या प्रकाशझोतापासून दूर झाले होते. 'तुम तो ठहरे परदेशी, साथ क्या निभाओगे' हे गाणे सुरुवातीला स्थानिक पातळीवर सादर केले जात होते. मात्र, अल्ताफ राजा यांनी त्यांच्या खास शैलीत हे गीत गायल्यावर त्याला प्रचंड लोकप्रियता

# पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात युवकाचा आत्महत्येचा प्रयत्न

पुणे

**पुणे** जिल्हाधिकारी कार्यालयात आज राम पाचकाळ या युवकाने मागण्या मान्य न झाल्याने आत्महत्येचा प्रयत्न केला. तो इमारतीच्या पाचव्या मजल्यावरील सुरक्षेच्या जाळीवर जाऊन बसला होता. या प्रकारामुळे काही काळ गोंधळ उडाला. पोलीस आणि अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे युवकाला सुरक्षित खाली उतरवण्यात यश आले. राजगड तालुक्यात महामार्गावरील अतिक्रमणाचे व्हिडिओ चित्रीकरण करत असताना त्याला काही जणांनी मारहाण केली होती. या प्रकरणात संबंधितांवर गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी तो जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन करण्यासाठी आला होता. मात्र, मागणी मान्य होत नसल्याने त्याने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाचव्या मजल्यावरील जाळीवर चढून बसत आत्महत्येचा प्रयत्न केला.

# कोकणातील जंगलात २० हून अधिक दुर्मीळ 'ब्लॅक पँथर'



चिपळूण

**अतिशय** दुर्मीळ असणाऱ्या 'ब्लॅक पँथर' अर्थात काळ्या बिबट्यांची संख्या कोकणात गेल्या काही वर्षांत वाढली आहे. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातही काळ्या बिबट्यांची (मेलेनिस्टिक लेपर्ड) नोंद झाली आहे. वन्यप्राण्यांसाठी सह्याद्री ते कोकण भ्रमणासाठी हा महत्त्वाचा मार्ग आहे. कर्नाटकाकडून येणारे तिलारी, आंबोलीमार्गे स्थलांतर होणारे वन्यजीव सह्याद्रीत काही काळ थांबून ते पुढे कोकणच्या दिशेने येत असल्याच्या नोंदी आहेत. या वन्य प्राण्यांमध्ये काळ्या बिबट्याची नोंद सापडली आहे.

वन्यजीव अभ्यासकांच्या निरीक्षणानुसार कोकणात साधारणपणे पंधरा ते वीस काळे बिबटे असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. हे प्रमाण अधिकही असण्याची शक्यता आहे. दाट झाडीत लपण्यासाठी बिबट्यांना काळा रंग हा उपयुक्त ठरतो. कोकणातील बहुतांश वने ही सदाहरित वनक्षेत्रात मोडतात. त्यामुळे राज्यातील इतर भागांच्या तुलनेत कोकणात, तसेच कर्नाटकात काळे बिबटे अधिक प्रमाणात आढळून येतात. काळा बिबट्या तथा ब्लॅक पँथर ही स्वतंत्र प्रजाती नव्हे तर बिबट्याचाच एक प्रकार मानला जातो. मेलानिन हे रंगद्रव्य शरीरात अधिक प्रमाणात झाल्याने त्याचा रंग पूर्णतः काळा दिसतो. काळ्या रंगाच्या ठिपक्यांचा पॅटर्न काही वेळा आढळतो. त्याची उपस्थिती ही वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने हा पुढील टप्पा गणला जात आहे.


# मडगाव-पनवेल स्थानकादरम्यान विशेष उन्हाळी गाड्या धावणार

मडगाव

**उन्हाळी** सुट्ट्यांमुळे वाढलेल्या प्रवासी गर्दीच्या पार्श्वभूमीवर भारतीय रेल्वे प्रशासनाने मडगाव जंक्शन ते पनवेल दरम्यान विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे.

रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक ०११०६ मडगाव-पनवेल स्पेशल १० मे रोजी मडगाव जंक्शनवरून सायं. ४.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजता पनवेल येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०११०५ ही पनवेल-मडगाव स्पेशल ११ मे रोजी सकाळी ५.४५ वाजता पनवेलवरून सुटून सायंकाळी ६.१० वाजता मडगाव जंक्शनला पोहोचेल. २३ डब्यांची ही विशेष गाडी करमाळी, थिवीम, सावंतवाडी रोड, कुडाळ, सिंधुदुर्ग, कणकवली, वैभववाडी रोड, राजापूर रोड, विलवडे, आडवली, रत्नागिरी, संगमेश्वर रोड, चिपळूण, खेड, माणगाव, रोहा आणि पेण या स्थानकांवर थांबणार आहे. प्रवाशांनी या विशेष गाड्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# पोहणे महागले! मुंबई पालिकेच्या स्विमिंग पूल शुल्कात ५ टक्के वाढ



मुंबई

**आरोग्यासाठी** उत्तम व्यायाम मानल्या जाणाऱ्या पोहण्याचा छंद मुंबईकरांच्या खिशाला महाग पडणार आहे. मुंबई पालिकेने आपल्या जलतरण तलावांच्या शुल्कात ५ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मासिक, त्रैमासिक व वार्षिक पाससाठी नागरिकांना आता जास्त पैसे मोजावे लागणार आहेत.

महापालिकेकडून मुंबईत सध्या १३ जलतरण तलाव नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. दादर, चेंबूर, कांदिवली, मालाड, दहिसर आणि मुलुंड येथील तलावांचा त्यात समावेश आहे. मात्र, मुलुंड, चेंबूर आणि दहिसर येथील तीन जलतरण तलाव दुरुस्तीमुळे बंद असल्याने उर्वरित तलावांवर गर्दी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पालिकेने ऑलिम्पिक आणि नॉन-ऑलिम्पिक दर्जाच्या जलतरण तलावांच्या शुल्कात ५ टक्के वाढ केली आहे. ऑलिम्पिक दर्जाच्या तलावांसाठी मासिक पास १,६०० रुपये, तर त्रैमासिक पास ३,५४० रुपये करण्यात आला आहे. नॉन-ऑलिम्पिक तलावांसाठी मासिक पास १,१६१ रुपये, त्रैमासिक २,३३१ रुपये आणि वार्षिक ९,७५१ रुपये आकारले जाणार आहेत.

# तलावात बुडून भावा-बहिणीसह वाचवायला गेलेल्या दोघांचा मृत्यू

अमरावती

**फोटोशूट** करताना तलावात बुडणाऱ्या बहिणीला पाहून भाऊ तिला वाचवायला गेला. मात्र भाऊ-बहीण आणि वाचवायला गेलेल्या आणखी दोघांचाही बुडून मृत्यू झाल्याची घटना महाजनपुरा परिसरात घडली. मार्डी मार्गावर डॉ. राजेंद्र गोडे महाविद्यालयामागील घातखेडा तलावात ही घटना घडली.

सोनाली नरेंद्र जोशी (१६), आदित्य नरेंद्र जोशी (१२), गजानन काकडे (१३) आणि पायल बबलू पंडित (१४) अशी मृतांची नावे आहेत. महाजनपुरा परिसरातील काही मुले दुपारी सहलीकरिता तलाव परिसरात गेली होती. जेवणानंतर सोनाली तलावाजवळ फोटोशूट करताना पाण्यात बुडू लागली. ती खोल पाण्यात जाऊ लागल्याचे दिसताच तिचा भाऊ आदित्य याच्यासह पायल पंडित आणि यश काकडे यांनी तिला वाचविण्यासाठी तलावात उडी घेतली. मात्र,खोल चिखल आणि पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने चौघांचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला.

# ओशिवरा नाल्यावरील पूल धोकादायक पालिकेचा नवा पूल बांधण्याचा निर्णय

मुंबई

**पश्चिम** उपनगरातील वाहतुकीसाठी महत्त्वाचा असणारा ओशिवरा नाल्यावरील पूल आता धोकादायक स्थितीत असल्याची माहिती आहे. त्यामुळे हा जुना पूल पाडून त्याठिकाणी नवीन पूल उभारण्याचा निर्णय मुंबई पालिका प्रशासनाने घेतला आहे. यासाठी तब्बल २० कोटी ५ लाख १८ हजार रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे.

पालिकेच्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये ओशिवरा नाल्यावरील पुलाचा स्लॅब धोकादायक अवस्थेत असल्याचे स्पष्ट झाले आहे. 'मे. एससीजी कन्सल्टिंग सर्व्हिसेस'ने पुलाचे पुनर्बांधणी आणि बेअरिंग बदलण्याची शिफारस केली होती. त्यानंतर वीरमाता जिजाबाई टेक्नोलॉजी इन्स्टिट्यूट (व्हीजेटीआय) कडून करण्यात आलेल्या पुनर्परीक्षणात पुलाचे सुपरस्ट्रक्चर पाडून नव्याने बांधकाम करण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे पालिका प्रशासनाने जुना पूल पाडून नवीन पूल उभारण्याचा निर्णय घेतला असून यासाठी सुमारे २० कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे.

# अपघात टाळण्यासाठी मध्य रेल्वेची यंत्रणा ! मोटरमनना वेळेआधी अलर्ट

मुंबई



**मध्य** रेल्वेने मुंबई उपनगरीय रेल्वे सेवेत सुरक्षितता वाढवण्यासाठी लोकल गाड्यांमध्ये सिग्नल लोकेशन अनाऊन्समेंट सिस्टम (एसआयएलएएस) अधिक सक्षम करण्याचा निर्णय घेतला. यामुळे मोटरमनना सिग्नलची अचूक माहिती वेळेआधी मिळून अपघात टाळण्यास मदत होण्याबरोबरच मोटरमनवरील तणावही कमी होणार आहे.

या प्रणालीद्वारे मोटरमनना पुढील सिग्नलची माहिती ऑडिओ अलर्टद्वारे आधीच मिळणार आहे. सिग्नलपासून ३५० आणि २५० मीटर आधी इशारे दिले जाणार असून, पिवळा सिग्नल ओलांडल्यानंतर पुढील लाल सिग्नलबाबत सतत सूचना मिळणार आहेत. पुढील स्थानकाची माहितीही वेळेआधी दिली जाणार आहे.

# किडवाईनगरची शाळा पाडून तीन वर्षे नवीन इमारतीबाबत पालिका उदासीन



मुंबई

**मुंबई** पालिका प्रशासनाच्या उदासीन कारभारामुळे शिवडीतील किडवाईनगर परिसरातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हाल सुरू आहेत. दुरुस्तीच्या नावाखाली पालिकेची शाळा पाडून तब्बल तीन वर्षे उलटून गेली. मात्र अद्याप नवीन शाळेच्या बांधकामाबाबत कोणतीही ठोस हालचाल झालेली नसल्याने पालिका प्रशासनावर टीका होत आहे.

उबाठा नगरसेविका आणि माजी महापौर श्रद्धा जाधव यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासोबतच पालिका शाळांची देखभाल आणि सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. किडवाईनगर येथे असलेली पालिकेची शाळा दुरुस्तीच्या कारणास्तव तीन वर्षांपूर्वी पाडण्यात आली होती. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी तात्पुरत्या स्वरूपात एसआरए इमारतीत वर्गखोल्या उपलब्ध करून दिल्या. मात्र, या इमारती उंच टेकडीवर असल्याने लहान विद्यार्थ्यांना दररोज शाळेत ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पावसाळ्यातही गैरसोय होते.

श्रद्धा जाधव यांनी पालिका प्रशासनाला नवीन शाळेचे बांधकाम तातडीने सुरू करण्याचे आवाहन केले आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, यासाठी प्रशासनाने त्वरित निर्णय घेऊन योग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची त्यांनी मागणी केली आहे.

# थकीत रकमेच्या नळजोडण्या न कापण्यासाठी पालिकेवर दबाव

मुंबई

**पिण्याच्या** पाणी बिलांच्या थकीत रकमेचे नळ कनेक्शन कापू नका, असा राजकीय दबाव पालिका कर्मचाऱ्यांवर वारंवार येत असल्यामुळे बिलांच्या रकमेची वसुली समाधानकारक होण्यास अडथळे येतात, अशी व्यथा एच-पूर्व-कार्यालयातून व्यक्त करण्यात आली. सांताक्रुझ, वाकोला, कालिना, खार, वांद्रे, परिसरात झोपडपट्ट्यांसह इमारती व व्यावसायिक कार्यालयांसह मिळून अंदाजे ९० हजार अधिकृत नळ कनेक्शन आहेत. यातील ५० टक्के लोकांकडे वर्षानुवर्षाची पाण्याच्या बिलांची थकीत रक्कम पालिकेला येणे आहे. अशा नळ कनेक्शन कापण्यासाठी जाणाऱ्या जल कामे विभागातील कर्मचाऱ्यांवर राजकीय दबाव येतात. त्यामुळे कारवाई न करता हात हलवत परतावे लागते. अशा राजकीय हस्तक्षेपामुळे पाणी बिलांची वसूली अपेक्षेप्रमाणे होत नाही. यामुळे आम्ही हतबल झालो आहोत.

# शेगावच्या संत गजानन महाराज मंदिरात मोबाईल वापरावर बंदी

बुलडाणा

**विदर्भाची** पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री संत गजानन महाराज समाधी मंदिर परिसरात आजपासून मोबाईल वापरण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. मंदिर प्रशासनाच्या या निर्णयामुळे भाविकांना शांततेत आणि सुरळीत दर्शन घेता यावे, हा उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे.

मंदिर परिसरात मोबाईलचा वापर केल्यामुळे इतर भाविकांना त्रास होतो, तसेच दर्शन प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. याची दखल घेत प्रशासनाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यापुढे मंदिरात येणाऱ्या सर्व भाविकांनी आपले मोबाईल फोन स्वीच ऑफ करूनच ठेवावेत, असे आवाहन मंदिर प्रशासनाने केले आहे. नियमांचे पालन करून सहकार्य करावे, असेही सांगण्यात आले आहे.

# पाणीटंचाईवर प्रशासनाचा झोपेचा बहाणा 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' सक्तीची करण्याची मागणी



उरण

**उरण** शहर व तालुक्यात दिवसेंदिवस भीषण होत चाललेल्या पाणीटंचाईच्या संकटावर प्रशासनाने अद्यापही ठोस पावले उचलली नसल्यामुळे नागरिकांचा संताप आता उफाळून येत आहे. वर्षानुवर्षे तीच समस्या, तीच आश्वासने आणि तीच तात्पुरती उपाययोजना यामुळे उरणकर त्रस्त झाले असून, आता दिखाव्यापेक्षा निर्णय हवा अशी आक्रमक भूमिका आहे.

उरण तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने शासनाकडे पाठविण्यात आलेल्या निवेदनात स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, पाणीटंचाई ही आता केवळ हंगामी समस्या राहिलेली नसून ती गंभीर आणि कायमस्वरूपी संकटात परिवर्तित झाली आहे. यावर मात करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंगसारखी शाश्वत योजना तात्काळ सक्तीची करणे अपरिहार्य बनले आहे. दरवर्षी उन्हाळा आला की पाण्याचे टँकर, राजकीय स्टंटबाजी आणि कागदोपत्री बैठका एवढ्यापुरतेच प्रशासनाचे 'काम' मर्यादित राहते. मात्र, पाण्याच्या मूळ समस्येवर कोणतीही दीर्घकालीन योजना राबवली जात नसल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. जनतेला पाणी नाही, पण योजनांच्या फाइल्स मात्र भरभरून आहेत, अशी बोचरी टीका यावेळी करण्यात आली. वाढती लोकसंख्या, अनियंत्रित बांधकामे, औद्योगिक प्रकल्पांचा वाढता दबाव आणि अपुरा जलसाठा व्यवस्था या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून उरणमध्ये पाण्याचा प्रश्न विकोपाला गेला आहे.

# सोलापुरात उबाठाचा पाणीटंचाईविरोधात मोर्चा

सोलापूर

**सोलापुरातील** पाणीटंचाईच्या प्रश्नावरून आज उबाठाने सोलापूर महानगरपालिकेसमोर जोरदार आंदोलन केले. शहरातील अनेक भागांत आठवड्यातून केवळ एकदाच पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर उबाठाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत निषेध नोंदवला.

उबाठाचे कार्यकर्ते म्हणाले की, पाणीपुरवठा अत्यल्प दाबाने होत असून काही भागांत फक्त एक ते दोन तासच पाणी दिले जाते, तर काही ठिकाणी गढूळ पाणीपुरवठा होत आहे. उन्हाळ्यातील वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याने पाणी साठवून ठेवावे लागत आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# संकटांची चाहूल काटकसरीचे पाऊल

संपूर्ण जगात आर्थिक स्थिरता मोठ्या प्रमाणावर आहे त्यात पुन्हा अमेरिका, इराण, इस्त्रायल, रशिया, युक्रेन यांच्यातील युद्धांमुळे नवी भर पडली आहे. विशेषतः भारताचे ज्या ज्या देशांशी मोठ्या प्रमाणावर आर्थिक संबंध आहेत. त्या देशांमधली अर्थव्यवस्थासुद्धा समाधानकारक नाही. अमेरिका, इराण संघर्षानंतर भारताचे ज्या प्रमुख दहा अरब राष्ट्रांशी मोठे आर्थिक व्यवहार होत असतात. ते दहा देश युद्धाच्या तडाख्यात सापडले. त्या देशांची आर्थिक व्यवस्था उभारण्यासाठी पुढची काही वर्षे जावी लागणार आहेत. या युद्धजन्य परिस्थितीत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या संसदेमध्ये निवेदन करून परिस्थितीचे गांभिर्य सांगितले होते. भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असल्याने इथली अर्थव्यवस्था आणि इंधनपुरवठा सुव्यवस्थित होण्याकरीता शक्य तेवढे प्रयत्न सुरू होते तरीदेखील एकूणच जागतिक स्तरावरच्या अस्थिरतेचा भारतावरही काही ना काही परिणाम होणे अपेक्षित आहे. त्याचे गांभिर्य लक्षात आल्यानेच आता पुन्हा पंतप्रधानांनी जाहीरपणे जनतेला काही काटकसरीचे उपाय सांगितले आहेत. देशाचे प्रमुख म्हणून त्यांनी जनतेला या सूचना करणे यात काही गैर नाही. परंतु एखादी गोष्ट सामान्य माणसाला पटवून द्यायची असेल किंवा त्याचे महत्त्व त्याच्या मनावर बिंबवायचे असेल तर त्याची सुरूवात देशाच्या नेतृत्वापासूनच व्हावी लागते. पंतप्रधान मोदींनी काटकसरीच्या ज्या उपाययोजना सांगितल्या आहेत त्यामध्ये स्वयंपाक करताना तेलाचा वापर कमी करा. परदेशी वस्तू कमीत कमी वापरा. स्वदेशी वस्तूंना प्राधान्य द्या. पुढचे वर्षभर सोने खरेदी करू नका. एवढेच नव्हे तर परदेशी दौरे टाळा आणि इंधनाची बचत करून सार्वजनिक परिवहन सेवेचा वापर करण्याचेही आवाहन त्यांनी केले आहे. त्यांच्या या सगळ्या सूचनांचे स्वागत आहे परंतु त्याची पहिली सुरुवात सरकारी यंत्रणांपासून करावी लागेल. तरच लोकांवर त्याचा परिणाम होईल किंवा त्याचे ते अनुकरण करतील.

### सुरुवात सरकारपासून व्हावी

आपल्याकडे उत्तम अर्थव्यवस्थेसाठी आणि राज्य व्यवस्थेसाठी वारंवार चाणक्यनीतीचे दाखले दिले जातात. आर्य चाणक्यांनीसुद्धा राज्य कारभारात काटकसर आणि उपलब्ध सगळ्या साधनांचा नियोजनपूर्वक वापर या गोष्टीला सर्वाधिक महत्त्व दिले होते. काहीसा त्याच चाणक्यसूत्रांचा आधार घेत पंतप्रधानांनी काटकसरीचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. स्वतः आर्य चाणक्य ते निःसंग आणि त्यागपूर्ण जीवन जगणारे व्यक्तिमत्त्व होते आणि त्यांनी सांगितलेला उपदेश त्यावेळच्या राजांकडून म्हणजेच चंद्रगुप्तांकडून अंमलात आणला जात होता. पंतप्रधानांना जर आपल्या सूचनांचा आदर व्हावा असे वाटत असेल तर सर्वप्रथम त्यांनी शासकीय यंत्रणांमध्ये या काटकसरीची सुरुवात करावी. मग अगदी पंतप्रधानांनी आवश्यक तेवढेच परदेश दौरे करावेत. मंत्र्यांनी, अधिकाऱ्यांनी किंवा शासनाकडे असलेल्या वाहनांचा कमीत कमी वापर करावा. आज देशभर सरकारी वाहनांची संख्या काही लाखांमध्ये आहे. त्यावर कोट्यवधी रुपयांचा इंधनखर्च होत असतो. अनावश्यक दौरे टाळून सरकारी यंत्रणांनी दहा टक्के जरी इंधन बचत केली तरी ती खूप मोठी बाब ठरेल. स्वयंपाकाचा गॅस किंवा खाद्यतेलाचा कमीत कमी वापर करण्याची सूचना ही एकूणच सार्वजनिक आरोग्याशी निगडीत आहे. शिवाय परदेशी वस्तूंपेक्षा स्वदेशी वस्तूंचा अधिकाधिक वापर करण्याचा त्यांचा सल्ला महत्त्वपूर्ण ठरतो. ज्यातून देशांतर्गत उद्योगांना पाठबळ मिळेल आणि देशाची आत्मनिर्भरताही वाढीला लागू शकेल. परंतु इथेसुद्धा सरकारी यंत्रणांमधून किंवा सरकारी प्रकल्पांमधून अधिकाधिक स्वदेशी वस्तू आणि तंत्राचा वापर केला गेला पाहिजे. पूर्वीपेक्षा स्वदेशी बनावटीच्या वस्तूंचे प्रमाण वाढलेले आहे. ही गोष्ट मान्य करीत असताना ते प्रमाण यापेक्षा अधिक करण्यावर भर दिला गेला पाहिजे. या पंतप्रधानांच्या काटकसरीच्या सप्तसूत्रांचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. परंतु केवळ जनतेला उपदेश करण्यापुरते ते मर्यादित राहू नये. आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे पंतप्रधानांनीच त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी काही सूत्रांबाबत करून दाखवली पाहिजे. तरच जनतेवर त्याचा सकारात्मक परिणाम होईल.

### सोने आणि अर्थव्यवस्था

लोकांनी वर्षभर सोने खरेदी करू नये हा सल्ला काहीसा आश्चर्यजनक वाटतो. याचा अर्थ सोन्याच्या किमतीवर नियंत्रण येण्याची भविष्यकाळात कुठलीही शक्यता दिसत नाही किंवा लोकांकडून शेअर्स किंवा बँकांमधल्या गुंतवणुकीपेक्षा सोन्यामध्ये सर्वाधिक गुंतवणूक होऊ लागली आहे. सरकारनेच गोल्ड बाँडसारख्या प्रकारांना प्रोत्साहन दिलेले आहे. अशावेळी लोकांनी गुंतवणुकीसाठी सुवर्णरोख्यांनादेखील प्राधान्य दिल्याचे लक्षात येते. सोनेविषयक पंतप्रधानांचा हा सल्ला एकूणच जागतिक स्तरावर आर्थिक परिस्थितीचाही अंदाज देणारा ठरतो. खरे तर पंतप्रधानांकडून दोन वेळा अशाप्रकारे काटकसरीचे उपदेश केले गेले आहेत. याचा अर्थ पुढच्या वर्ष-दोन वर्षात भारताला मोठी आर्थिक झळ सोसावी लागू शकते. महागाईचाही चटका बसू शकतो. संकटांची ही चाहूल लागल्यानेच सावधानतेची पावले उचलली जात आहेत. परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी केल्या जाणाऱ्या उपाययोजना महत्त्वपूर्ण ठरतात व परिस्थितीचे गांभिर्यही सांगून जातात. भारताची लोकसंख्या त्यातल्या सर्वसामान्य माणसाची आर्थिक क्षमता आणि सर्व प्रकारच्या आवश्यक वस्तूंचा पुरवठा कायम राहाण्यासाठी या प्रकारची खबरदारी गरजेचीही ठरते. एकीकडे भारताला पुढच्या वर्ष-दीड वर्षात जगातली तिसरी आर्थिक महासत्ता व्हायचे आहे. परंतु अचानकपणे उद्‌भवलेल्या जागतिक स्तरावरच्या आर्थिक संकटांनी भारताला विचार करायला भाग पाडले आहे. निवडणुकांवर होणारा प्रचंड खर्च हासुद्धा नियंत्रणात आणण्याची गरज आहे. पंतप्रधानांनी केलेल्या या केवळ काटकसरीच्या सूचना नाहीत तर सरकारपुढे उभ्या ठाकलेल्या आव्हानांची ती कबुली ठरते. सावध ऐका पुढल्या हाका असेच त्याचे स्वरूप म्हणता येईल.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

नातं म्हणजे काय? जिथे तुम्ही शब्द न कापता बोलू शकता अश्रू न लपवता रडू शकता आणि संकोच न करता मदत करू शकता, तेच खरे नातं आहे..

## पंचांग

**मंगळवार, १२ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**



* **वैशाख कृष्ण दशमी**
* **नक्षत्र : पूर्वा भाद्रपदा**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ११-२४ कुंभ**
**१९-२५ ते २४-०० मीन**

**रवी उदय- ०६-०७**
**रवी अस्त- १९-०४**

**संत मुक्ताबाई पुण्यतिथी-मुक्ताईनगर**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### मलाई ब्रोकली

★ **साहित्य :** २ कप ब्रोकलीचे मध्यम तुकडे, १/२ कप हंग कर्ड (चक्का), १/२ कप पनीर (किसलेले), २ टेबलस्पून काजू पेस्ट, १ टेबलस्पून क्रीम (ऐच्छिक), १ टीस्पून आले-लसूण पेस्ट, १/२ टीस्पून काळी मिरी पावडर, १/२ टीस्पून गरम मसाला, १ टीस्पून लिंबाचा रस, मीठ चवीनुसार, १ टेबलस्पून तेल किंवा बटर


★ **कृती:** यासाठी सर्वप्रथम ब्रोकली स्वच्छ धुवून उकळत्या पाण्यात २-३ मिनिटे ब्लांच करा आणि लगेच थंड पाण्यात टाका. त्यामुळे रंग आणि कुरकुरीतपणा टिकतो.

एका बाउलमध्ये हँग कर्ड, पनीर, काजू पेस्ट आणि क्रीम एकत्र करून एकसारखे मिश्रण तयार करा. त्यात आले-लसूण पेस्ट, काळी मिरी, गरम मसाला, मीठ आणि लिंबाचा रस घालून चांगले मिक्स करा. आता



पाण्यात काहीवेळ वाफवून मग ब्रोकलीला या मिश्रणात घाला आणि हलक्या हाताने मसाला यावर कोट करा. याला १०-१५ मिनिटे मॅरिनेट होऊ द्या. पॅनमध्ये थोडे तेल किंवा बटर गरम करा. त्यात मॅरिनेट केलेली ब्रोकली मध्यम आचेवर शॅलो फ्राय करा. ब्रोकलीला हलका गोल्डन रंग येईपर्यंत शिजवा. मध्ये मध्ये हलवत राहा.

गरमागरम मलाई ब्रोकली प्लेटमध्ये काढा आणि वरून थोडी काळी मिरी किंवा चाट मसाला शिंपडा. ही डिश ग्रीन चटणी किंवा हंग कर्ड डिपसोबत सर्व्ह केली तर चव आणखी वाढते.




# गुजरात-हैदराबादमध्ये आज टक्कर होणार

## अव्वल स्थानावर पोहोचण्यासाठी रस्सीखेच

**अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर उद्या होणार्या आयपीएलच्या ५६ व्या सामन्यात गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात जोरदार टक्कर होणार आहे. हा सामना जिंकून आयपीएलच्या प्लेआफमध्ये आपले स्थान जवळपास निश्चित करण्याचे लक्ष्य दोन्ही संघाचे असेल. त्यासोबत दोन्ही संघांकडे आयपीएलच्या गुणतालिकेतील अव्वल स्थानावर विराजमान होण्याची संधी देखील आहे. गुजरातचा संघ सलग पाचव्या विजय मिळवण्यासाठी सज्ज झाला आहे.**



■ अहमदाबाद

**आयपीएलच्या** या हंगामात हैदराबादने ११ सामने खेळले आहेत. त्यातील ७ सामन्यांत विजय मिळवला, तर ४ सामन्यांत पराभव पत्करावा लागला. त्यामुळे हैदराबाद गुणतालिकेत १४ गुण आणि ०.७३७ नेटरेनरेटसह दुसर्या स्थानावर आहे. गुजरातनेही आतापर्यंत ११ सामन्यांत आपले नशीब आजमावले आहे. त्यातील ७ सामन्यांत विजय नोंदवला आणि ४ सामन्यांत पराभव झाल्यामुळे गुजरात गुणतालिकेत १४ गुण आणि ०.२२८ नेटरनरेटसह तिसऱ्या स्थानावर आहे.

गुजरातचा संघ खूप संतुलित आहे. या संघाची फलंदाजी कर्णधार गिल आणि साई सुदर्शन यांच्याभोवती केंद्रित आहे. या दोघांनी संघाच्या वरच्या फळीला भक्कम आधार दिला आहे आणि पॉवरप्लेमध्ये चांगली कामगिरी करुन गोलंदाजांना चांगलेच चोपून काढले आहे. मधल्या षटकांमध्ये जोस बटलर आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी मोलाची भूमिका बजावली, ज्यामुळे संघाला मोठी धावसंख्या उभारण्यास किंवा मोठे लक्ष्य गाठण्यास मदत झाली. गुजरातची गोलंदाजीही मजबूत आहे, ज्यात मोहम्मद सिराज आणि कागिसो रबाडा यांच्यात बळी घेण्याची क्षमता आहे. रशीद खानचे नियंत्रण आणि मधल्या षटकांमधील सामन्याचे चित्र पालटणारी गोलंदाजी यांचा समावेश आहे. हैदराबादने पुन्हा एकदा आपल्या स्फोटक फलंदाजीने प्रभावित केले आहे, जी कोणत्याही विरोधी संघासाठी मोठी चिंतेची बाब आहे. हैदराबादमधील अव्वल चार फलंदाज अभिषेक शर्मा, ट्रॅव्हिस हेड, इशान किशन आणि हेनरिक क्लासेन यांनी सातत्याने आक्रमक फलंदाजी केली आहे. फलंदाजांच्या चांगल्या कामगिरीमुळे हैदराबादने या हंगामात सातत्याने २०० पेक्षा जास्त धावा केल्या.

## १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धा मुंबईमध्ये १४ मेपासून सुरू

■ मुंबई

**मुंबई** क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने मुंबईतील १४ वर्षांखालील खेळाडूंचा संघ निवडण्यासाठी घेण्यात येणाऱ्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेला १४ मेपासून प्रारंभ होणार आहे. दिलीप वेंगसरकर फाऊंडेशनच्या वतीने गेली ३० वर्षे या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून यंदा एचडीएफसी बँक परिवर्तन चषकासाठी या स्पर्धा खेळविण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी सुनील गावस्कर संघ, दिलीप वेंगसरकर संघ, रवी शास्त्री संघ आणि सचिन तेंडुलकर संघ अशा ४ संघांची निवड करण्यात येणार असून हे सामने दोन दिवसांचे खेळविण्यात येणार आहेत. हे सामने ओव्हल येथील दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमी मैदान आणि कर्नाटक सपोर्टिंग क्लब (क्रॉस मैदान) येथे खेळविण्यात येणार आहेत. अंतिम फेरीच्या साखळी लढती २१ आणि २२ मे या कालावधीत होणार आहेत.

## बंगळुरुचा मुख्य प्रशिक्षक अँडी फ्लॉवरला १५ टक्के दंड

■ रायपूर

**आयपीएलमध्ये** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा मुख्य प्रशिक्षक अँडी फ्लॉवर यांच्यावर बीसीसीआयने कठोर कारवाई केली. या सामन्यावेळी पंचांशी आक्रमक वर्तन केल्याबद्दल आणि अपशब्द वापरल्याबद्दल त्यांच्यावर मॅच फीच्या १५ टक्के दंड ठोठावण्यात आला.

रविवारी रायपूर येथे बंगळुरुविरुद्ध मुंबई सामन्यात १८ व्या षटकात अँडी फ्लॉवरने चौथ्या पंचांशी एका निर्णयावरून वाद घातला. आयपीएलच्या गव्हर्निंग बॉडीने याला गैरवर्तन मानून लेव्हल-१ चा गुन्हा घोषित केला आहे. अँडी पंचांशी भिडले, अपशब्द माइकमध्ये कैद झाले सामन्याच्या रोमांचक टप्प्यावर अँडी फ्लॉवर डगआउटजवळ उपस्थित चौथ्या पंचांशी आक्रमकपणे बोलू लागले. आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.३ नुसार, सामन्यादरम्यान 'ऑडिबल ऑब्सेनिटी' (ऐकू येणारे अपशब्द) वापरण्यास मनाई आहे.

## बार्सिलोनाला 'ला लीगा'चे विजेतेपद! रियल माद्रिदचा पराभव



■ बार्सिलोना

**ला** लीगाच्या अंतिम सामन्यात एफसी बार्सिलोनाने रियल माद्रिदला २-० ने पराभूत करून विजेतेपद पटकावले. बार्सिलोनाची ही २९ वी ला लीगा ट्रॉफी आहे. या सामन्यात रियल माद्रिद आपल्या ३ प्रमुख खेळाडूंशिवाय मैदानात उतरला होता. स्टार खेळाडू किलियन एमबाप्पे हॅमस्ट्रिंगच्या समस्येमुळे हा सामना खेळू शकला नाही, तर फेडेरिको वाल्वेर्दे देखील या सामन्याचा भाग नव्हता. सराव सत्रादरम्यान झालेल्या समस्येमुळे डीन हुईसेनदेखील हा सामना खेळला नाही.

या स्पर्धेतील अंतिम सामन्यात बार्सिलोनाच्या फेरान टोरेसने पहिल्या गोलचा पाया रचला. त्याने नवव्या मिनिटाला अँटोनियो रुडिगरकडून फाऊल करवून घेतला, ज्याचा फायदा मार्कस रॅशफोर्डने घेतला. गोलकीपर थिबॉ कोर्तुआ रॅशफोर्डची जोरदार किक रोखू शकला नाही. १८व्या मिनिटाला डॅनी ओल्मोने स्ट्रायकरला पास दिला आणि टोरेसने बार्सिलोनाची आघाडी दुप्पट केली. मध्यंतरापूर्वी टॉरेसने पुन्हा एकदा उत्कृष्ट पास दिल्यावर रॅशफोर्डला आपला तिसरा गोल करण्याची उत्तम संधी मिळाली, पण यावेळी कोर्टुआने त्याचा शॉट बाहेर ढकलला आणि ओल्मोने कॉर्नरवरून मारलेला फटकाही बाहेर गेला. दुसऱ्या हाफच्या सुरुवातीला रियल माद्रिदला संघर्ष करावा लागला, कोर्टुआने रॅशफोर्डचा क्रॉस अडवला आणि टॉरेसचा एक अप्रतिम शॉट वाचवला.

## आरव सेठीची हॅट्‌ट्रिक

■ मुंबई

**न्यू** हिंद स्पोर्टिंग क्लब आयोजित ३४ व्या एलआयसी कल्पेश गोविंद कोळी स्मृती क्रिकेट स्पर्धेतील दुसऱ्या फेरीतील सामने अत्यंत रोमहर्षक झाले. वाशी सेंटरचा मध्यमगती गोलंदाज आरव सेठीने अफलातून गोलंदाजी करत हॅट्ट्रिकसह सहा बळी घेत घाटकोपर सेंटरचा दुसऱ्या डावात ११९ धावांत खुर्दा उडवला आणि त्यांना फॉलोऑन दिला. दादर पारशी येथील रमेश दडकर मैदानावर रविवारी झालेल्या सामन्यात दिवसअखेर वाशी सेंटरने ५ बाद १७३ धावा केल्या होत्या. ठाणे सेंटरने बदलापूर सेंटरवर डाव आणि १७२ धावांनी दणदणीत विजय मिळवला. माटुंगा जिमखाना मैदानावर झालेल्या सामन्यात तनय महांसारिया याने ३४ धावांत ८ विकेट्स घेत शानदार कामगिरी केली.

## दुसऱ्या डावात बांगलादेश १७९ धावांच्या आघाडीवर



■ ढाका

**मीरपूरमध्ये** सुरू असलेल्या २ कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्याच्या चौथ्या दिवशी आज बांगलादेशने दुसऱ्या डावात पाकिस्तानवर १७९ धावांनी आघाडी घेतली. ढगाळ वातावरण आणि अपुर्या प्रकाशामुळे खेळ थांबवण्यात आला. दिवसाअखेर बांगलादेशने ३ बाद १५२ धावा केल्या. बांगलादेशने पहिल्या डावात ४१३ धावा ठोकल्या होत्या. याप्रत्युत्तरात पाकिस्तानने ३८६ धावा केल्याने बांगलादेशला २७ धावांची आघाडी मिळाली होती. त्यानंतर तिसऱ्या दिवसाअखेर बांगलादेशने बिनबाद ७ धावा केल्या होत्या. आज सकाळी महमुदुल हसन जॉय ५ धावांवर पायचित झाला. शादमन इस्लाम १० धावा करुन माघारी परतल्यामुळे बांगलादेशचा डाव अडचणीत आला होता. मग मोमिनुल हक आणि नजमुल होसेन शांतो या जोडीने संघाची धावसंख्या ३ बाद १२८ वर पोहोचवली. मग मोमिनुल हक ५६ धावांवर खेळत असताना तो शाहीन शाह आफ्रिदीने शिकार बनवले.

## वडाळ्यामध्ये १४ व १५ मे रोजी मुंबई महापौर केसरी कुस्ती स्पर्धा

■ मुंबई

मुंबई महापालिका आणि मुंबई शहर तालीम संघटनेच्या वतीने ३२ व्या अखिल भारतीय मुंबई महापौर केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिराच्या क्रीडांगणात १४ आणि १५ मे रोजी रंगणार आहे. या स्पर्धेच्या संदर्भात मुंबई शहर तालीम संघाचे अध्यक्ष संजय शेटे म्हणाले की, महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेनंतर मुंबई महापौर केसरी कुस्ती स्पर्धेचा उल्लेख केला जातो. त्यामुळे देशभरातील कुस्तीपटू या स्पर्धेसाठी आपली तयारी करतात. अनेक नावाजलेले कुस्तीपटू स्पर्धेत सहभागी होत असल्याने वेगळी चुरस स्पर्धेत पहायला मिळते. ६ वर्षाच्या काळानंतर होत असलेल्या स्पर्धेत यंदा मुंबई महापौर केसरी (८२ किलोपेक्षा जास्त), कुमार मुंबई महापौर केसरीच्या (५० ते ६० किलो, १७ वर्षाखालील)जोडीने कोकण विभागीय ५५ ते ६२ किलो, ६२ ते ७२ किलो आणि ७२ ते ८२ किलो वजनी गटाच्या लढती होतील. लाखो रुपयांची रोख बक्षिसे यंदाच्या स्पर्धेचे प्रमुख वैशिष्ट्य असेल.

## भारताचे नेमबाज नीरु-विवानला कांस्य

■ अल्माटी

**भारताचे** नेमबाज नीरू धांडा आणि विवान कपूर यांनी ट्रॅप मिश्र सांघिक प्रकारात कांस्यपदक जिंकले. अशाप्रकारे भारताने कझाकिस्तानमधील अल्माटी येथे झालेल्या आयएसएसएफ शॉटगन विश्वचषक स्पर्धेतील आपल्या मोहिमेचा सकारात्मक शेवट केला. हे पदक नीरू आणि विवानचे ऑलिम्पिक प्रकारातील पहिले आयएसएसएफ विश्वचषक पदक होते. इटलीची अव्वल जोडी सिल्वाना स्टँको आणि माउरो डी फिलिपिस यांनी रौप्यपदक पटकाविले. चायनीज तैपेईच्या कुन-पेई यांग आणि वान-यू लिऊ यांनी अंतिम फेरीत ३६ गुणांच्या विश्वविक्रमी स्कोअरसह आपले दुसरे विश्वचषक सुवर्णपदक जिंकले.

# पक्ष पुनर्बांधणीसाठी तेजस्वी यादवांचा राज्यव्यापी दौरा

■ पाटणा

**तळागाळातील** कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचून पक्षाची नव्याने पुनर्बांधणी करण्यासाठी राष्ट्रीय जनता दलाचे (राजद) हंगामी राष्ट्रीय अध्यक्ष तेजस्वी यादव ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून राज्यव्यापी दौरा करणार आहेत.

विधानसभेच्या निवडणुकीत राजदची कामगिरी अत्यंत निराशाजनक राहिली. १४३ जागांपैकी पक्षाला केवळ २५ जागा जिंकता आल्या. या पार्श्वभूमीवर राजदचे बिहार प्रदेशाध्यक्ष मंगनीलाल मंडल तेजस्वी यादव यांच्या दौऱ्याची रुपरेषा सध्या निश्चित करत आहेत. आपल्या या यात्रेच्या माध्यमातून तेजस्वी यादव जिल्ह्या-जिल्ह्यांमधील कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून स्थानिक समस्या जाणून घेणार आहेत.

यात्रेच्या आधी पाटणामध्ये पक्षाचे पदाधिकारी आणि विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या उमेदवारांशी तेजस्वी यादव थेट संवाद साधणार आहेत.

# नोएडात तरुणीचा जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळला

■ नोएडा

**ग्रेटर** नोएडाच्या दादरी परिसरात लग्नानंतर अवघ्या ३ महिन्यांतच २२ वर्षीय तरुणीचा जळालेल्या अवस्थेत मृतदेह सापडला. पीडितेच्या कुटुंबियांनी तिच्या पती व सासरच्या मंडळींवर तिला मारहाण करून हत्या केल्याचा आणि त्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. पोलिसांनी मोनिकाचा पती अनुज, शेजारी कन्नू आणि इतर अनेकांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

मोनिका नागरने अनुज चौहानसोबत १७ फेब्रुवारी रोजी प्रेमविवाह केला. या दोघांनी कोर्टात जाऊन लग्न केले. या दोघांच्या लग्नाला घरच्यांचीही संमती होती. लग्नापूर्वी मोनिका तिच्या आईबरोबर एका भाड्याच्या घरात राहत होती. दरम्यान, मोनिकाने तिच्या भावाला सांगितले होते की, तिचा नवरा आणि सासरचे लोक तिला मारहाण करतात. तिच्या नावावर असलेली संपत्ती नवऱ्याच्या नावावर करून देण्यासाठी तिच्यामागे तगादा लावण्यात आला, असा दावा तिच्या कुटुंबियांनी केला.

मोनिकाचे नातेवाईक अनिल यांनी आरोप केला की, लग्नानंतर दोन महिन्यांच्या आतच छळ सुरू झाला होता. त्यांनी पैशांसाठी तिच्याशी लग्न केले. तिच्या नावावर कोट्यवधी रुपयांची मालमत्ता होती आणि ती हस्तांतरित करून घेण्यासाठी ते तिचा सतत छळ करत राहिले.

# योगींच्या मंत्रिमंडळात ६० मंत्री! कमाल मर्यादा गाठली

■ लखनौ

**उत्तर** प्रदेश विधानसभेच्या आगामी २०२७ च्या निवडणुकीसाठी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आतापासूनच तयारी सुरू केली आहे. निवडणूक रणनितीचा एक भाग म्हणून योगी आदित्यनाथ यांनी नुकताच आपल्या मंत्रिमंडळाचा विस्तार केला आहे. मंत्रिमंडळ विस्तारात योगींनी स्थानिक राजकारण आणि जातीय समीकरण जुळवण्याचा प्रयत्न केला आहे. या विस्तारामुळे योगींच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या आता साठवर पोहोचली आहे. ही सदस्य संख्येची कायद्यानुसार कमाल मर्यादा आहे.

योगींनी आपल्या मंत्रिमंडळात सहा नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. तर दोन विद्यमान मंत्र्यांना कॅबिनेटमध्ये सामावून घेण्यात आले आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

उत्तर प्रदेश भाजपाचे प्रदेशाध्यक्ष भूपेंद्र सिंह चौधरी आणि समाजवादी पार्टीत बंडखोरी करून भाजपामध्ये सामील झालेले आमदार मनोज कुमार पांडे यांची कॅबिनेटमध्ये वर्णी लावण्यात आली आहे.

तर अजित पाल सिंह, सोमेंद्र तोमर, कृष्णा पासवान, सुरेंद्र दिलेर आणि हंसराज विश्वकर्मा यांना राज्यमंत्री पदाची शपथ देण्यात आली आहे. या कृतीतून भाजपाने समाजवादी पार्टीला संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे.



■ किंशासा

# काँगोमध्ये हिंसाचार! ६९ जणांचा मृत्यू

**डेमोक्रॅटिक** रिपब्लिक ऑफ काँगोमधील इतुरी प्रांतात हेमा आणि लेंडू समुदायांच्या सशस्त्र गटात पुन्हा एकदा हिंसाचार भडकला. त्यात ६९ जणांचा मृत्यू झाला. काँगो ३० वर्षांपासून हिंसाचार आणि गृहयुद्धाचे केंद्र बनले आहे. सोने, कोबाल्ट, तांबे, युरेनियम आणि हिरे यांसारख्या खनिज साठ्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी अनेक सशस्त्र गट लढत आहेत.

या हल्ल्याआधी 'कन्व्हेन्शन फॉर द पॉप्युलर रिव्होल्यूशन' (सीआरपी) नावाच्या दुसऱ्या सशस्त्र गटाने पिंबो परिसराजवळील काँगोच्या लष्कराच्या (एफएआरडीसी) चौक्यांवर हल्ला केला होता. सीआरपी स्वतःला हेमा समुदायाच्या हितासाठी लढणारा गट म्हणून ओळखला जातो. सीआरपीच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून कोडेकोच्या लढवय्यांनी केलेल्या हल्ल्यात ६९ जण ठार झाले. मृतांमध्ये १९ मिलिशिया सदस्य आणि सैनिकांचा समावेश आहे. मात्र, या भागात सशस्त्र लढवय्यांच्या उपस्थितीमुळे मृतदेह बाहेर काढण्यात आणि दफन करण्यात अडथळा येत आहे. आतापर्यंत केवळ २५ मृतदेहांवरच अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. अलीकडेच जोरदार हल्ले झालेल्या बोसा गावाच्या परिसरात अनेक मृतदेह उघड्यावर पडलेले आढळले.

देश विदेश

# पाकिस्तानात इंधन दरवाढ शहबाज सरकारचा निर्णय

■ इस्लामाबाद

**जागतिक** तणावपूर्ण परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अटींमुळे पाकिस्तान सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या दरात अचानक वाढ केली आहे. यामुळे इंधनाच्या दरात प्रति लिटर सुमारे १५ पाकिस्तानी रुपयांची वाढ करण्यात आली असून, पेट्रोल-डिझेलचे दर लिटरमागे ४१५ रुपयांच्या पुढे गेले आहेत. सरकारने ऐन मध्यरात्री घेतलेल्या निर्णयामुळे पाकिस्तानमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्ष आणि होर्मुजचा जलमार्ग येथील पुरवठा अडथळ्यांमुळे जागतिक स्तरावर इंधन टंचाई निर्माण झाली आहे. याचा थेट फटका पाकिस्तानला बसत आहे. पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. इंधन दरवाढीचा परिणाम वाहतूक, अन्नधान्य आणि दैनंदिन जीवनावरील खर्चावर होणार असल्याने महागाई आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अमेरिका व्हिसा नियमात बदल अर्जदारांना प्रश्नांची उत्तरे बंधनकारक

■ न्यूयॉर्क

**अमेरिकेत** जाणाऱ्या प्रवाशांसाठी व्हिसा प्रक्रियेत पुन्हा कडक नियम लागू करण्यात आले आहेत. अमेरिकन परराष्ट्र विभागाने व्हिसा अर्जामध्ये दोन नवीन प्रश्नांचा समावेश केला असून, त्यामुळे अर्जदारांची अडचण वाढण्याची शक्यता आहे.

नवीन नियमांनुसार व्हिसासाठी अर्ज करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आता दोन प्रश्नांची उत्तरे देणे बंधनकारक असणार आहे. पहिला प्रश्न असा आहे की, तुमच्या देशात किंवा तुम्ही राहत असलेल्या ठिकाणी तुम्ही कधी छळ किंवा दुर्व्यवहार अनुभवला आहे का? तर दुसरा प्रश्न असा आहे की, मायदेशी परतल्यानंतर तुम्हाला तिथे छळ होण्याची भीती वाटते का? या प्रश्नांना ''हो' असे उत्तर दिल्यास व्हिसा अधिकारी असा निष्कर्ष काढू शकतात की अर्जदाराचा त्याच्या मायदेशात परतण्याचा हेतू नसून अमेरिकेत आश्रय मागण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे व्हिसा नाकारला जाण्याची शक्यता वाढू शकते. तर 'नाही' असे उत्तर दिल्यास, पूर्वी दिलेल्या उत्तरांशी विसंगती असल्यास ते पुरावा म्हणून विचारात घेतले जाऊ शकते.

दरम्यान, अमेरिकेत एच-१बी व्हिसा संदर्भातही मोठा बदल प्रस्तावित करण्यात आला आहे. काही खासदारांनी नवीन एच-१बी व्हिसा देण्यावर तीन वर्षांची बंदी घालण्याचे विधेयक मांडले आहे.

# शिक्षकांची माहिती अपलोड न केल्यास प्रवेश बंद

पुणे विद्यापीठाचा इशारा

■ पुणे

**सावित्रीबाई** फुले पुणे विद्यापीठ यांनी संलग्न महाविद्यालयांसाठी महत्त्वाचा निर्णय घेत शिक्षकांची माहिती १८ मेपर्यंत अनिवार्यपणे अपलोड करण्याचे निर्देश दिले आहेत. निर्धारित मुदतीत माहिती अपलोड न केल्यास संबंधित महाविद्यालयांच्या प्रथम वर्ष प्रवेशावर बंदी घालण्यात येणार असल्याचा इशाराही विद्यापीठाने दिला आहे. विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांना बीओडी पोर्टलवर किमान ५० टक्के शिक्षकांची माहिती अपलोड करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या माध्यमातून महाविद्यालयांमधील शिक्षकांची प्रत्यक्ष संख्या आणि उपलब्धता तपासण्याचा उद्देश आहे. विद्यापीठाच्या मान्यतेनुसार आवश्यक शिक्षकसंख्या ५० टक्क्यांपेक्षा कमी असल्यास अशा महाविद्यालयांवर कारवाई केली जाणार आहे. विद्यापरिषदेने जानेवारीमध्येच यासंदर्भात निर्णय घेतला असून, २०२६-२७ शैक्षणिक वर्षासाठी अशा महाविद्यालयांतील प्रथम वर्ष प्रवेश थांबवण्याचे ठरवले आहे.

# आता ट्रॅव्हल्स जिहादविरुद्ध हिंदू संघटना आक्रमक

■ अहिल्यानगर

**अहिल्यानगरमध्ये** 'ट्रॅव्हल्स जिहाद'च्या विरोधात हिंदू संघटनांनी आक्रमक आंदोलन छेडत पुणे-अहिल्यानगर महामार्गावर रास्ता रोको केला. भाजपा आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली कायनेटिक चौक येथे झालेल्या या आंदोलनामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. हिंदू महिलांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर हे आंदोलन करण्यात आले असून, ट्रॅव्हल्स आणि सार्वजनिक वाहतुकीदरम्यान महिलांची छेडछाड होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

या आंदोलनापूर्वी शहरातून मोठी रॅली काढली. त्यानंतर आंदोलकांनी नगर-पुणे महामार्गावरील कायनेटिक चौकात ठिय्या देत संबंधित प्रकारांविरोधात

## पुणे-नगर महामार्ग ठप्प

घोषणाबाजी केली. आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी संग्राम जगताप म्हणाले की, राज्यात 'लव्ह जिहाद', 'लँड जिहाद' आणि 'व्होट जिहाद'नंतर आता 'ट्रॅव्हल्स जिहाद' नावाचा प्रकार वाढत असल्याचा दावा केला. महिलांचा प्रवासादरम्यान पाठलाग करणे, त्यांची वैयक्तिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न करणे आणि समाज माध्यमावर संपर्क साधणे, अशा घटना वाढत आहेत.एसटी बस, खासगी ट्रॅव्हल्स किंवा रिक्षामधून प्रवास करणाऱ्या महिलांना लक्ष्य केले जात असल्याच्या तक्रारी आहेत. बिश्नोई समाज काळविटाला देव मानते आणि त्याच्याविरुद्ध काही झाल्यास जशास तसे उत्तर देतो. तसेच गोमाता आणि मातांकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्यांना 'जशास तसे उत्तर' दिले पाहिजे.

# मालेगावचा माजी महापौर गोवंश तस्करी प्रकरणात आरोपी

■ नाशिक

मालेगावचे माजी महापौर तसेच एमआयएमचे गटनेते अब्दुल मलिक मोहम्मद युसुफ यांच्याविरोधात गोवंश तस्करीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मालेगाव येथील पवारवाडी आणि किल्ला पोलिसांनी स्वतंत्र कारवाई करत सवंदगाव येथील फार्महाऊस तसेच इस्लामाबाद भागातील घराजवळील गोदामावर छापे टाकले. या तिन्ही ठिकाणांवरून एकूण १८ गोवंश जनावरे जप्त करण्यात आली असून त्यांची किंमत सुमारे ३ लाख २० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. कारवाईदरम्यान फार्महाऊसमध्ये जनावरे अत्यंत अमानुष पद्धतीने बांधून ठेवलेली आढळली. किल्ला पोलिसांनी केलेल्या छाप्यात आणखी काही जनावरेही ताब्यात घेतली. या प्रकरणात पोलिसांनी तातडीने गुन्हा नोंदवला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, कारवाई सुरू असताना अब्दुल मलिक यांनी पोलिसांच्या कामात अडथळा आणत काही जनावरे पळवून लावण्याचा प्रयत्न केल्याची माहिती आहे. त्यानंतर ते घटनास्थळावरून फरार झाले असून पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे.

**जया भादुरी हिंदी चित्रपटसृष्टीतल्या सर्वोत्कृष्ट अभिनेत्रींपैकी एक आहेत. शर्मिला टागोर, मुमताज आणि हेमामालिनी सारख्या ताकदीच्या नायिका पडदा गाजवत असताना जया भादुरी या नावाने चित्रपट क्षेत्रात प्रवेश केला. सत्तरच्या शतकात सर्वसामान्य, नाकासमोर चालणाऱ्या मुलीला ग्लॅमरच्या जगात पाय रोवणे कठीण होते.पण, जया भादुरी अर्थातच जया बच्चन यांचा साधेपणा, निरागसता प्रेक्षकांना एवढा भावला की बस्स.. आपल्या शेजारी रहाणाऱ्या मुलीबद्दल जशी आत्मियता असते तशीच त्यांना प्रेक्षकांकडून मिळाली.**

जया भादुरी यांची आई इंदिरा आणि वडील तरुण कुमार भादुरी हे बंगाली कुटुंब.जया भादुरी शालेय जीवनात अभ्यासात टॉपर होत्या. त्यांनी भोपाळमध्ये शिक्षण घेतले होते आणि तिथेही त्यांनी आपला पहिला नंबर टिकवून ठेवला होता.

जया बच्चन यांना वयाच्या १५ व्या वर्षी सत्यजित रे यांच्या 'महानगर' या सिनेमात काम करण्याची संधी मिळाली होती. मात्र यापूर्वी भारतीय फिल्म अँड टेलिव्हिजन फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये 'सुमन' या सिनेमासाठी जया पहिल्यांदाच कॅमेऱ्यासमोर आल्या होत्या. ऋषिकेश मुखर्जी यांनी 'सुमन' हा सिनेमा बघून जया बच्चन यांची निवड 'गुड्डी' या सिनेमासाठी केली होती. तेव्हा जया बच्चन या इन्स्टिट्युटमध्ये शिकत होत्या. याच काळात बासू चॅटर्जी यांनीदेखील जया यांना सिनेमाची ऑफर दिली होती. मात्र जया बच्चन यांनी विनम्रपूर्वक त्यांची ऑफर नाकारली. इन्स्टिट्यूटच्या नियमांनुसार येथील विद्यार्थी शिकत असताना सिनेमात काम करु शकत नसल्याचे कारण जया यांनी चॅटर्जी यांना दिले होते.

जया यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांनी इन्स्टिट्यूटमध्ये गोल्ड मेडलही मिळवले होते. 'गुड्डी' चित्रपटही गाजला आणि जया भादुरी यांना लागलीच राजश्री प्रोडक्शनचा की फिल्म 'उपहार' या चित्रपटाची नायिका बनण्याची संधी


## अत्यंत कुशल व ताकदीच्या अभिनेत्री

# जया भादुरी बच्चन




मिळाली. पारंपरिक पेहराव, सामान्य वागण्याने त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. अत्यंत कुशलतेने आपल्या इमेजमध्ये बदल केला आणि पिया का घर, अनामिका, परिचय, कोरा कागज, अभिमान, मिली, कोशिशसारखे उत्तम चित्रपट केले. ताकदीची अभिनेत्री म्हणून ओळख झाल्यावर त्यांच्यासमवेत काम करताना भले भले कलाकारही घाबरत असत. अमिताभ बच्चन आणि संजीवकुमार यांच्याबरोबर त्यांनी अधिक काम केले. अमिताभ बच्चन आणि जया बच्चन यांची पहिली भेट पुण्याचा फिल्म अँड टेलीव्हिजन इन्स्टीटयुटमध्ये झाली. त्यानंतर ते गुड्डीच्या सेटवर भेटले. जया भादुरी आणि राजेश खन्ना एकत्र काम करत असलेल्या 'बावर्ची' या चित्रपटाच्या सेटवर अमिताभ सतत जया यांना भेटायला जात असत आणि त्यामुळे दोघांचे प्रेम आणखी वाढत गेले.

'जंजीर' चित्रपटाच्या यशानंतर सर्व मित्र सेलिब्रेशनसाठी लंडनला जाण्याची तयारी करत होते, जयादेखील त्यांच्यासोबत लंडनला जाणार होत्या. मात्र, वडील हरिवंशराय बच्चन यांच्या अटीमुळे दोघांनाही त्याच दिवशी लग्न करावे लागले. लंडनला जाणाऱ्या मित्रपरिवारात जयादेखील आहेत, हे जेव्हा हरिवंशराय बच्चन यांना समजले तेव्हा ते म्हणाले की, जया आणि अमिताभ यांना लंडनला एकत्र जायचे असेल तर, दोघांनाही आधी लग्न करावे



लागेल. याच कारणास्तव, लंडनला जाण्यापूर्वी बंगाली संस्कृतीनुसार ३ जून १९७३ मध्ये दोघांचा विवाह पार पडला होता. आणि त्याच दिवशी दोघे हनिमूनसाठी थेट लंडनला रवाना झाले होते.लग्नानंतरही जया यांनी चित्रपटांमध्ये काम सुरूच ठेवले होते. यानंतर जया बच्चन १९७५ मध्ये 'शोले' या चित्रपटात दिसल्या. यानंतर त्यांच्या पहिल्या बाळाचा जन्म झाला आणि जया यांनी बॉलिवूडमधून ब्रेक घेतला. त्यानंतर जवळपास १७ वर्षांनी १९९८ मध्ये जया बच्चन पुन्हा बॉलीवूडमध्ये परतल्या. मात्र,१९८१ मध्ये जया यांनी यश चोप्रांच्या खास विनंतीवरून 'सिलसिला'या चित्रपटात काम केले होते. मेगास्टार अमिताभ बच्चन आणि जया भादुरी या जोडीचे 'चुपके चुपके', 'अभिमान,' 'सिलसिला' आणि 'जंजीर', 'एक नजर' 'कभी खूशी कभी गम' हे त्यांचे गाजलेले चित्रपट आहेत. लग्नानंतर त्या संसारात रमून गेल्या. आज बच्चन परिवार जगातील ग्लॅमरस, प्रसिद्ध आणि श्रीमंत परिवार आहे. त्यांचे कुटूंब सुपरस्टार असले तरी त्यामागे जया भादुरी बच्चन यांचे मोठे योगदान आहे, हे सर्वज्ञात आहे.चित्रपटांमध्ये सक्रिय असताना त्यांनी तीन सर्वोत्कृष्ट अभिनेत्री आणि तीन सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री पुरस्कारांसह नऊ फिल्मफेअर पुरस्कार जिंकले आहेत. चित्रपटसृष्टीबरोबरच राजकारणातही नाव कमवणाऱ्या अशा मोजक्या कलाकारांपैकी जया भादुरी एक आहेत. जया भादुरी यांची राजकीय कारकीर्दही बरीच यशस्वी ठरली आहे. २००४ मध्ये त्यांनी समाजवादी पक्षाच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश केला. त्यानंतर ही जया भादुरी अनेकवेळा राज्यसभा खासदार झाल्या आहेत. जया भादुरी आपल्या स्पष्टवक्ते शैलीसाठी देखील ओळखली जातात, कोणत्याही मुद्यावर बोलताना त्या अजिबात संकोच करत नाहीत.



# आयटीआर-४ भरणाऱ्यांसाठी नियमात एक महत्त्वाचा बदल

■ नवी दिल्ली

**करनिर्धारण** वर्ष २०२६-२७ साठी आयटीआर ४ दाखल करणाऱ्या करदात्यांसाठी नियमात एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. त्यानुसार आता आयटीआर-४ करदात्यांना आपल्या बँक खात्यातील शिल्लक रक्कम जाहीर करणे बंधनकारक आहे. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने करप्रणाली अधिक पारदर्शक आणि माहिती आधारित बनवण्यासाठी आयकर विवरणपत्रात हा महत्त्वपूर्ण बदल केला आहे. ३० मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने आयटीआर-४ मध्ये अतिरिक्त बँक शिल्लक माहिती देणे अनिवार्य केले आहे. आतापर्यंत आयटीआर ४ दाखल करणाऱ्याना फक्त खाते क्रमांक, आयएफएससी कोड आणि बँकेचे नाव यासारखा बँक खात्याचा तपशिल भरणे आवश्यक होते. खात्यातील प्रत्यक्ष शिल्लक उघड करणे बंधनकारक नव्हते.

# पुण्याच्या बुधवार पेठेतून ५ बांगलादेशी महिला ताब्यात

**पुणे** - पुण्याच्या बुधवार पेठेतून फरासखाना पोलिसांनी पाच बांगलादेशी महिलांना काल रात्री ताब्यात घेतले. फरासखाना पोलिसांनी काल रात्री या परिसरात विशेष शोधमोहीम राबवली होती. त्यात या महिला कोणत्याही कागदपत्रांशिवाय छुप्या मार्गाने सीमा ओलांडून भारतात आल्याचे आढळून आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षण प्रशांत भस्मे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने रविवारी मध्यरात्री एक ते सकाळी नऊपर्यंत बुधवार पेठेत शोध मोहीम राबवली. बुधवार पेठेतील माचीस बिल्डिंगमध्ये काही बांगलादेशी महिला बेकायदेशीरपणे राहात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्याआधारे पोलिसांनी मोहीम राबवली असता या पाच महिला आढळून आल्या.

# एकाही आरोपीला अटक नाही विकास लवांडे यांची माहिती

■ पुणे

**राष्ट्रवादी** काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेश प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर दोन दिवसांपूर्वी संग्राम भंडारे व त्यांच्या काही सहकाऱ्यांनी शाईफेक केली होती. या प्रकरणी त लवांडे यांनी तक्रार दाखल केली होती. मात्र, अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नसल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

विकास लवांडे यांनी एक पोस्ट करत म्हटले आहे की, माझ्यावर जीवघेणा हल्ला झाल्यानंतर दोन दिवस झाले १५ पैकी एकाही आरोपीला अद्याप पर्यंत पोलिसांनी अटक केलेली नाही पुण्यातील वापरलेल्या ३चार चाकी गाड्या दोन रिव्हॉल्वर काहीही ताब्यात घेतलेले नाही. गुन्हेगारांना पूर्ण मोकळीक आहे. सत्ताधारी मंत्री व काही आमदार त्यांना जाहीरपणे पाठबळ देत आहेत. राज्यात कायदा सुव्यवस्था आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे का?

## राहुल देवला काय झाले?



**अभिनेता** राहुल देव याला गोव्यामध्ये एका जाहिरातीच्या चित्रीकरणादरम्यान अपघात झाला असून, त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. एका फिटनेस उत्पादनाच्या जाहिरातीसाठी चित्रीकरण सुरू असताना एका साहसी दृश्यादरम्यान हा अपघात घडला. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याच्या पायाला फ्रॅक्चर झाल्याचे निदान झाले आहे. या अपघातानंतर राहुल देव याला तत्काळ स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती स्थिर असली तरी डॉक्टरांनी त्याला काही दिवस पूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे. या दुखापतीमुळे त्याच्या आगामी काही प्रकल्पांचे चित्रीकरण पुढे ढकलण्यात येण्याची शक्यता आहे.

राहुल देव हा चित्रपटसृष्टीतील सर्वात तंदुरुस्त अभिनेत्यांपैकी एक मानला जातो. वयाच्या या टप्प्यावरही तो स्वतःचे स्टंट स्वतः करण्यासाठी ओळखला जातो.

या अपघाताची बातमी समजताच चाहत्यांनी आणि चित्रपटसृष्टीतील सहकाऱ्यांनी तो लवकर बरा व्हावा यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या

## 'कृष्ण और चिठ्ठी'चा ट्रेलर रिलीज




**अरुण** गोविल आणि दर्शील सफारी यांची मुख्य भूमिका असलेल्या 'कृष्ण और चिठ्ठी' या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून, यामध्ये क्रिकेट आणि अध्यात्माचा एक अनोखा संगम पाहायला मिळत आहे. विनय भारद्वाज आणि सौमित्र सिंग यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेला हा चित्रपट खेळ, भक्ती आणि कौटुंबिक भावनांची सांगड घालणारा आहे.

या चित्रपटात दर्शील सफारी याने 'अर्जुन' नावाच्या तरुणाची भूमिका साकारली आहे, ज्याचा प्रवास श्रद्धा आणि जिद्दीवर आधारित असल्याचे दिसून येते. क्रिकेटच्या मैदानातील जिद्द आणि ईश्वरावरील विश्वास या दोन धाग्यांभोवती या चित्रपटाची कथा गुंफलेली आहे. या चित्रपटात सज्जाद डेलाफ्रूझ, मीर सरवर आणि फैज खान यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.

काश्मीरमधील पहलगामच्या नयनरम्य परिसरात या चित्रपटाचे चित्रीकरण करण्यात आले आहे. सोशल मीडियावर या ट्रेलरला प्रेक्षकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, अनेकांनी यातील पार्श्वसंगीत आणि चित्रपटाच्या विषयाचे कौतुक केले आहे. हा चित्रपट येत्या २९ मे २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

## नेपोटिझममुळे संधी हुकल्या



**बॉलिवूड** मधील घराणेशाहीच्या मुद्यावर अभिनेत्री क्रिती सनॉन हिने आपले स्पष्ट मत मांडले असून, चित्रपटसृष्टीतील आपला प्रवास हा पूर्णपणे मेहनतीवर आधारित असल्याचे तिने म्हटले आहे. अनेकदा चांगल्या भूमिका केवळ घराणेशाहीमुळे किंवा स्टार किडस् असल्यामुळे इतरांकडे गेल्याचे तिने मान्य केले, मात्र यामुळे खचून न जाता स्वतःला सिद्ध करण्यावर भर दिल्याचे तिने स्पष्ट केले.

क्रितीने आपल्या अनुभवांवर भाष्य करताना सांगितले की, आपल्याला मिळणारी प्रत्येक संधी ही कमावलेली आहे आणि कोणतीही गोष्ट आयती मिळालेली नाही. बाहेरून आलेल्या कलाकारांना आपली जागा निर्माण करण्यासाठी अधिक संघर्ष करावा लागतो, असे सांगताना तिने व्यावसायिकतेचे महत्त्व अधोरेखित केले. 'कॉकटेल २' सारख्या मोठ्या प्रकल्पाचा भाग होताना आपल्या मेहनतीचे फळ मिळाल्याची भावना तिने व्यक्त केली. एका प्रतिष्ठित मुलाखतीत बोलताना तिने नमूद केले की, चित्रपटसृष्टीत प्रतिभा महत्त्वाची ठरते, पण संधी मिळण्याच्या प्रक्रियेत अनेकदा असमानता पाहायला मिळते. अशा परिस्थितीतही स्वतःच्या कौशल्यावर विश्वास ठेवून पुढे जाणे महत्त्वाचे असते. सध्याच्या काळात प्रेक्षक केवळ गुणवत्तेलाच दाद देतात, हा विचार मनात ठेवून आपण काम करत असल्याचे तिने आवर्जून सांगितले.

## अमिषाबाईंचे टीकास्त्र

**बॉलिवूड** अभिनेत्री अमिषा पटेलने सोशल मीडियाच्या माध्यमातून सध्याच्या पिढीतील अभिनेत्रींवर आणि त्यांच्या प्रसिद्धी मिळवण्याच्या पद्धतींवर सडकून टीका केली आहे. अमिषाच्या मते, वर्षाला केवळ दोन साधारण चित्रपट केल्याने कोणीही सुपरस्टार होत नाही. तिने नमूद केले की, अनेक अभिनेत्री स्वतःकडे एकही एकल ब्लॉकबस्टर चित्रपट नसताना केवळ प्रसिद्धी माध्यमांचा (पीआर) वापर करून स्वतःला मोठे स्टार म्हणून मिरवत आहेत.

अमिषाने 'एक्स'वर पोस्ट करत स्पष्ट केले की, जोपर्यंत एखादा कलाकार बॉक्स ऑफिसवर इतिहास घडवणारी कामगिरी करत नाही, तोपर्यंत त्याने स्वतः ला सुपरस्टार म्हणवून घेऊ नये. आजच्या काळात १०० कोटींची कमाई करणे ही मोठी गोष्ट राहिलेली नाही, असेही तिने म्हटले आहे. ज्या अभिनेत्रींचे चित्रपट २०० कोटींचा आकडाही पार करू शकत नाहीत, त्या केवळ पीआर टीमला पैसे देऊन स्वतः ला प्रथम क्रमांकाच्या अभिनेत्री असल्याचे भासवतात, असा टोला तिने लगावला.



## दिशाच्या हॉलीवूडपटाचा ट्रेलर रिलीज



**अभिनेत्री** दिशा पटानी हिने 'द पोर्टल ऑफ फोर्स' या चित्रपटाच्या माध्यमातून हॉलिवूडमध्ये पदार्पण केले असून, या बहुप्रतिक्षित चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात ती हॉलिवूडचे दिग्गज अभिनेते केविन स्पेसी यांच्यासोबत स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. या निमित्ताने दिशाच्या जागतिक स्तरावरील अभिनयाच्या प्रवासाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली आहे.

या चित्रपटात दिशाने 'जेसिका' नावाची मुख्य भूमिका साकारली असून, तिचे पात्र कथेचा केंद्रबिंदू असल्याचे ट्रेलरवरून स्पष्ट होत आहे. 'स्टॅटीगार्ड्स' आणि 'हॉलीगार्ड्स' या दोन प्राचीन शक्तींमधील संघर्षात ती 'निवडलेली' (द चोजन वन) व्यक्ती म्हणून समोर येते. दोन परस्परविरोधी जगांना जोडणारा दुवा म्हणून तिची भूमिका या फँटसी-ॲक्शन चित्रपटामध्ये अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. केविन स्पेसी यांच्यासोबतच या चित्रपटात डॉल्फ लुंड्ग्रेन, टायरीस गिब्सन आणि एरिक रॉबर्ट्स यांसारखे आंतरराष्ट्रीय कलाकार देखील महत्त्वाच्या भूमिकेत आहेत.

## स्वतःची नवनिर्मिती अपरिहार्य : परलीन



**गायक** परलीन गिल याने संगीत विश्वातील वाढत्या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर कलाकारांच्या कल्पकतेवर भाष्य केले असून, मूळ विचार आणि अस्सल सादरीकरण हेच कलाकाराला श्रोत्यांशी जोडून ठेवण्यास मदत करते, असे प्रतिपादन केले आहे. सध्याच्या काळात रिमिक्स आणि जुन्या गाण्यांच्या नवीन आवृत्त्यांचा कल वाढत असला, तरी स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी स्वतःची नवनिर्मिती महत्त्वाची असल्याचे त्याने नमूद केले. संगीत ही केवळ एक कला नसून ती भावनांची अभिव्यक्ती आहे आणि जेव्हा एखादा कलाकार स्वतःची मूळ कला सादर करतो, तेव्हा श्रोते त्याच्याशी अधिक सहजपणे जोडले जातात, असा विश्वास त्याने व्यक्त केला. तंत्रज्ञाना मुळे संगीत निर्मिती सोपी झाली असली, तरी त्यातील मानवी भावना आणि मौलिकता टिकवून ठेवणे हे मोठे आव्हान असल्याचे गिल याने या मुलाखतीत स्पष्ट केले.

कलाकारांनी केवळ प्रसिद्धीच्या मागे न धावता आपल्या कलेत सातत्य आणि वेगळेपण जपले पाहिजे, असा सल्लाही त्याने यावेळी दिला. संगीताच्या क्षेत्रात दीर्घकाळ टिकून राहण्यासाठी स्वतःची खास शैली विकसित करणे अनिवार्य असल्याचे त्याने आवर्जून सांगितले.

## नवापूर एमआयडीसीत अग्नितांडव टेक्स्टाईल कंपनी जळून खाक

■ नंदुरबार

**नंदुरबार** जिल्ह्यातील नवापुर एमआयडीसीतील श्रीनिझो फॅशन प्रायव्हेट लिमिटेड या टेक्स्टाईल कंपनीला भीषण आग लागली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. आगीने काही क्षणांतच रौद्र रूप धारण केल्याने काळ्या धुराचे प्रचंड लोट तब्बल १५ किलोमीटर अंतरावरूनही दिसत होते.

सुरुवातीला लहान स्वरूपात असलेली ही आग अल्पावधीतच संपूर्ण कंपनीत पसरली. कंपनीत मोठ्या प्रमाणात कापड, रसायने, कच्चा माल आणि मशिनरी असल्याने आगीने भीषण स्वरूप धारण केले. यामध्ये सुमारे ८ ते १० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती आहे. दरम्यान, आगीदरम्यान कंपनी परिसरात एक ते तीन मोठे स्फोट झाल्याची माहिती आहे. आग विझवण्यासाठी गुजरातमधील सोनगड आणि व्यारा तसेच नंदुरबार, साक्री आणि पिंपळनेर येथून अतिरिक्त अग्निशमन बंब मागवले होते. आगीचे नेमके कारण स्पष्ट झाले नाही तरी शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त जात आहे.

## मुलीच्या हळदीतच वडिलांचा मृत्यू लग्नघरावर दु:खाचा डोंगर कोसळला

■ पालघर

**मुलीच्या** लग्नाचा आनंदोत्सव सुरू असतानाच वधूच्या वडिलांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात घडली. दत्तात्रय उबाळे (६०) यांचे मुलीच्या हळदीच्या दिवशीच निधन झाल्याने आनंदी घरावर दुःखाचा डोंगर कोसळला. दत्तात्रय उबाळे तहसील कार्यालयातून सेवानिवृत्त झाले होते. तिसरी मुलगी हर्षदाच्या लग्नासाठी गेल्या अनेक दिवसांपासून ते तयारीत व्यस्त होते. ९ मे रोजी हळदीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला, तर १० मे रोजी लग्न सोहळा होता. पाहुण्यांची गर्दी, लग्नाची लगबग आणि मुलीला हळद लावण्याची तयारी सुरू असतानाच दत्तात्रय यांची अचानक प्रकृती बिघडली. कुटुंबियांनी त्यांना प्रथम मोखाडा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती अधिक खालावल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलवले. तिथे उपचार सुरू असतानाच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. ही बातमी लग्न मंडपात पोहोचली. वधूला वडिलांच्या निधनाची माहिती नव्हती. उपचार सुरू आहेत, ते लवकरच परत येतील, असे सांगत नातेवाईकांनी तिला धीर दिला. मात्र, लग्नाची वेळ जवळ आल्याने आणि सर्व पाहुणे उपस्थित असल्याने नातेवाईकांनी मोठ्या धैर्याने परिस्थिती हाताळत लग्न सोहळा पार पाडला.

## पुण्यात परिवहनच्या कार्यालयावर समाजवादी पार्टीचे धरणे आंदोलन

■ पालघर

**पुणे** महानगर परिवहन महामंडळातील (पीएमपीएमएल) कथित भ्रष्टाचाराच्या मुद्यावर आक्रमक भूमिका घेत शहर समाजवादी पार्टीने पीएमपीएमएल कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला.

पुणे शहर समाजवादी पार्टीचे अध्यक्ष जांबुवंत मनोहर यांनी पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. याप्रसंगी पीएमपीएमएल प्रशासनावर त्यांनी गंभीर आरोप केले. माहितीच्या अधिकाराखाली मागितलेली माहिती वारंवार लपवली जाते. अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती दिली जाते.तसेच बेकायदा पदोन्नती आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांत कोणतीही कठोर कारवाई केली जात नाही,असे आरोप जांबुवंत मनोहर यांनी केले. प्रशासनाने बेकायदेशीर पदोन्नतीबाबत वेतनवाढ थांबवल्याचे मान्य केले असले तरी,पदोन्नती अद्याप रद्द करण्यात आलेली नाही,असा दावा करत या प्रकरणातील दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी जांबुवंत मनोहर यांनी केली.

## पंतप्रधानांच्या सल्ल्यानंतर पाच उद्योगांत भूकंप

पान १ वरून

कारण म्हणजे रासायनिक खते आणि आयात करतो. मात्र त्यांचा हा सल्ला प्रत्यक्षात आणणे अशक्य आहे, असे ९० टक्के शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. रासायनिक खते वापरल्याशिवाय आता शेती




होऊ शकत नाही. फळभाज्या असो, धान्य असो किंवा फळांची लागवड असो प्रत्येक ठिकाणी रासायनिक खते वापरावीच लागतात. याचे कारण रासायनिक खते वापरून मातीची पोत गेल्याने त्या मातीवर आता सेंद्रीय खेत वापरून काहीही उपयोग नाही. सेंद्रीय खत वापरायचे असेल तर किमान पाच वर्षे शेतीत कोणतेही पीक न घेता शेत रिकामे ठेवावे लागेल. त्यानंतरच मातीची पोत काहीशी सुधारून सेंद्रीय खताचा वापर होऊ शकतो. मात्र हेलिकॉप्टरने फिरणाऱ्या राजकारणाऱ्यांना हेही माहित नसल्याने मोठे संकट निर्माण झाले आहे. आजच्या परिस्थितीत रासायनिक खतांची आयात बंद केली तर शेती कोलमडून जाईल, अशी परिस्थिती आहे, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. पंतप्रधान मोदी यांनी देशभक्तीची आण देत देशवासियांना काटकसरीचा सल्ला दिला आहे. दुर्दैवाने हा सल्ला प्रत्यक्षात आणणे हे सामान्य देशवासियांच्या आवाक्याबाहेर आहे. यामुळे हा सल्ला कागदावर योग्य असला तरी ते प्रत्यक्षात येणे अशक्य वाटते. सर्वच उद्योगातील माणसे आज त्रस्त झाली आहेत. मात्र कोणीही उघडपणे बोलायला किंवा कॅमेरासमोर याबद्दल बोलण्यास तयार नाही.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, आताच्या घडीला ज्या प्रकारची जागतिक पातळीवर परिस्थिती तयार झाली आहे, त्याचा सर्वच देशांच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडत आहे. आपल्या बाजूला असलेल्या पाकिस्तान तर पेट्रोलचे भाव साडेचारशे रुपये इतके वर गेले आहेत. पेट्रोल डिझेल याची अनेक देशात कमतरता आहे. आपल्या भारतामध्ये पंतप्रदान नरेंद्र मोदी यांच्यामुळे पेट्रोल-डिझेल आणि गॅस या गोष्टी आपल्याला मिळत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे की, या गोष्टींचा अमर्याद वापर आपल्याला करता येणार नाही. पुरवठा साखळीची परिस्थिती पाहता आणि परकीय चलन आपल्याला कसे वाचवता येईल, याकरिता पंतप्रधान मोदी यांनी केलेले आवाहन योग्य आहे. त्याला सर्वांनी प्रतिसाद द्यावा, अशी विनंती आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी यांनी मोदींच्या या आवाहनाचा एक्सवर पोस्ट करून चांगलाच समाचार घेतला. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काल जनतेला त्याग करण्याचा उपदेश केला. सोने खरेदी करू नका, परदेशी जाऊ नका, पेट्रोल-डिझेलचा




कमीत कमी वापर करा, रासायनिक खते आणि खाद्यतेलाचा स्वयंपाकात कमीत कमी वापर करा, मेट्रोने प्रवास करा,वर्क फ्रॉम होम करा, असे आवाहन मोदींनी केले. खरेतर मोदींचे हे आवाहन किंवा जनतेला केलेला उपदेश म्हणजे त्यांच्या बारा वर्षांच्या सत्ताकाळातल्या नाकर्ते पणाचा पुरावा आहे. मोदींनी १२ वर्षांत देशाला अशा टप्प्यावर आणून ठेवले आहे की,जनतेने काय खरेदी करावे, काय खरेदी करू नये, कुठे फिरायला जायचे , कुठे जाऊ नये हे सरकार सांगत आहे. मोदी दरवेळी सर्वसामान्य जनतेवर जबाबदारी टाकतात आणि स्वतः जबाबदारीपासून दूर पळतात. देश चालवणे हे आता तडजोड करणाऱ्या पंतप्रधानांच्या आवाक्यात राहिलेले नाही.

## डॉ. लोहिया ॲक्युपंक्चरचे सायनमध्ये नवीन क्लिनिक

**मुंबई :** गेल्या २५ वर्षांहून अधिक काळ मुंबईकरांच्या विश्वासाचे केंद्र ठरलेल्या 'डॉ. लोहिया ॲक्युपंक्चर'तर्फे आता सायन येथे नवीन क्लिनिक सुरू करण्यात आले. दादर, ठाणे, अंधेरी, पनवेल, वाशी, मुंबईतील विविध भागांतील रुग्णांचा वाढता प्रतिसाद, विश्वास आणि उपचारांची वाढती मागणी लक्षात घेऊन हे नवीन केंद्र सुरू करण्यात आल्याची माहिती संस्थेतर्फे देण्यात आली.

'डॉ. लोहिया ॲक्युपंक्चर'ने गेल्या अनेक वर्षांत औषधांशिवाय आणि शस्त्रक्रियेशिवाय हजारो रुग्णांना वेदनामुक्त आणि आनंदी आयुष्य मिळवून दिले आहे. पाठदुखी, मानदुखी, गुडघेदुखी, स्लिप डिस्क, फ्रोझन शोल्डर, पॅरालिसिस, महिलांचे आजार तसेच विविध दीर्घकालीन समस्यांवर ॲक्युपंक्चर उपचारांद्वारे अनेक रुग्णांना मोठा दिलासा मिळाला.

## शिंदेंच्या नगरसेवकाकडून भाजपा पदाधिकाऱ्याच्या मुलाला मारहाण

■ बदलापूर

**बदलापूरमध्ये** शिंदे गटाचे नगरसेवक रोहन पाटील यांनी भाजपा पदाधिकाऱ्याचा मुलगा सनी पाटीलला बेदम मारहाण केली. सनी पाटील यांचे वडील मारुती पाटील हे पालिका निवडणुकीत नगरसेवक रोहन पाटील यांच्या विरोधात उभे होते. त्यानंतरपासून दोन्ही गटांमध्ये वाद सुरू होता. हळदी समारंभाच्या कार्यक्रमादरम्यान हा वाद पुन्हा चिघळला. यावेळी नगरसेवक रोहन पाटील, माजी नगरसेवक सूरदास पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सनी पाटील यांना मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला. बदलापूर पोलिसांनी रोहन पाटील, सूरदास पाटील, प्रथमेश पाटील, राकेश पाटील, किशोर शेलार आणि जनार्दन धर्मा पाटील यांच्यासह एकूण दहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला.

## पश्चिम आशिया तणावावर केंद्राची राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेत बैठक


■ नवी दिल्ली

**पश्चिम** आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार सतर्क झाले असून संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेत उच्चस्तरीय मंत्रिगटाची दीड तास बैठक पार पडली. या बैठकीत देशातील पेट्रोल, डिझेल, एलपीजी आणि खतांच्या पुरवठ्याचा आढावा घेतला. जागतिक परिस्थितीचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होऊ नये यासाठी केंद्र सरकारकडून आवश्यक उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला.

या बैठकीला केंद्रीय आरोग्य आणि रसायन-खते मंत्री जे.पी. नड्डा,पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह, संसदीय कामकाज मंत्री किरेन रीजीजू यांच्यासह इतर वरिष्ठ मंत्री आणि अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत जागतिक बाजारात वाढत असलेल्या कच्च्या तेलाच्या किमतींचा भारतावर होणारा परिणाम तपासला. पेट्रोल, डिझेल, एलपीजी आणि खतांचा पुरवठा अखंडित राहण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील यावर भर दिला. पुरवठा साखळीत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी विविध मंत्रालयांमध्ये समन्वय वाढवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती देणयात आली.

राजनाथ सिंह यांनी सांगितले की,पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या जोखमींच्या पार्श्वभूमीवर ऊर्जा पुरवठा साखळी आणि आवश्यक वस्तूंच्या देशांतर्गत उपलब्धतेचा आढावा घेण्यात आला. सरकार सर्व आवश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रभावीपणे काम करत आहे.

# नवाकाळ शब्दकोडे–१६०३



## आडवे शब्द –

१. विकसित होत असलेले, प्रगतीच्या मार्गावर असलेले ६. योगायोगाने १०. पावसाळ्याचा पहिला महिना ११. विचारधारा, मनाचा ग्रह १२. ढकलाढकली १४. माज १५. माणूसघाणा, एकांतात रमणारा १७. वेगळा, सुटा १८. कण्यातील लहान हाड २१. ऐक्य २३. झेप २४. मधुमेहींसाठी वर्ज्य असलेली २५. केतूसारखा दुसरा छायाग्रह २६. अरिष्ट २८. धटिंगण २९. मुघले आझममध्ये दिलीपकुमारने साकारलेली भूमिका ३१. गाव ३२. नेत्रांजन ३४. प्रामाणिकपणा ३७. गवसणी, कव्हर ३८. समजूतदार ४२. नेम, व्रत ४४. निःश्वास ४६. मेंढा ४७. भाजीबाजार, घाऊक बाजारपेठ ५०. सनसनाटी ५१. धनी ५२. खालचा ओठ ५३. नोकर ५४. अपेक्षेपेक्षा आधी ५६. मौज, गंमत, चेष्टा ५७. एकटा, एकांतवास ५९. बारीक फोड ६१. विशाल ६२. मोठा ६३. अंतःकरण ६४. पिच्छा ६६. गोंडा घोळणे ६८. उत्तम पीक देणारी जमीन ७०. ताजा चारा ७२. सायकलच्या चाकाची अथवा चष्म्याची धातूची फ्रेम ७४. सातू ७६. प्राप्तीची इच्छा ७८. कुत्रा ८०. सायंकाळचा हुरहूर लावणारा अवधी ८१. पक्षी ८२. भांडण ८३. चोप ८५. टिप्पणी ८६. काया ८९. साठ मिनिटे ९१. दया ९३. गती ९६. समुद्रकिनाऱ्याला लागून असलेला वाळूचा पट्टा ९८. तांबडी झाक ९९. समृद्धी १०१. किरकोळ १०४. रामजन्माची तिथी १०५. वचक १०६. फाटाफूट १०७. अपशकुन

## उभे शब्द –

१. खेद, खंत २. उकळी ३. कृतघ्न, खाल्ल्या मिठाला न जागणारा, या नावाचा राजेश खन्ना, अमिताभ बच्चन यांचा चित्रपट प्रसिद्ध ४. छान थंडगार ५. लुच्चा थापेबाज मनुष्य, असत्य शब्द ६. कंबर ७. महाभारतातील युधिष्ठिराचे संबोधन ८. मोका ९. अतिशय घाबरणे, घाबरगुंडी उडणे १०. समोरासमोर १२. म्हशीचा टोणगा १३. पावसापासून रक्षण करणारा डगला १६. सगळीकडून अडचण १९. काटकी २०. हिरमोड २१. जमिनीचे क्षेत्रफळ मोजण्याचे परिमाण , चाळीस गुंठे २२. विपुल संपत्ती २६. युद्ध २७. ओझे, बोजा ३०. विनयशील, नम्र ३२. डोंगरकडा ३३. महिना ३५. दया, कणव ३६. ढिला, बेशिस्त कारभार ३७. झाडाचा बुंधा, वाईट सवय ३९. सावकाश ४०. पिशाच्च ४१. जमीन ४३. लग्न ठरल्याचे जाहीर करणारा कार्यक्रम ४४. कंटाळा ४५. शोभणारा ४६. द्रोणाचार्यांना गुरुदक्षिणा म्हणून अंगठा कापून देणारा धनुर्धर ४८. वाघाचे ओरडणे ४९. अतिविचार करत बसल्यास प्रत्यक्षात कोणतेच काम होत नाही याअर्थी म्हण- 'अति शहाणा ×× ×× ×××' ५१. आरूढ ५२. शेळी ५५. नादी लागणे ५६. जास्त किंमतीचे ५८. मयसभा उभारल्यावर पांडवांनी केलेला यज्ञ ६०. मनुष्य, मानव ६१. भीती ६३. व्याकूळ ६५. ददात ६७. आश्चर्य ६९. उपजत आवड ७१. वस्ती ७३. गढी ७५. आगामी काळाबाबत नेमके अंदाज वर्तवणारा ७७. तात्पुरता बांधलेला लाकडी पूल ७९. खुंटी, रहस्य ८४. कर्ज ८७. पैंजण, तोरड्या ८८. मजबूत ९०. मानवंदना ९१. मिळकत ९२. पृथ्वी ९४. अडथळ्यविना, तडक ९५. बाष्प ९७. कमरेला तलवार अडकवण्याची जागा १००. बगळा १०१. स्वाक्षरी १०२. मनोहर १०३. छत •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६०२ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. अराजक ५. सुज्ञ ७. मजेदार ९. अर्धांगी १०. बुजबुजाट ११. कार्यवाही १४. लगट १५. सुसाट १५अ. साठेबाजी १६. कावा १७. रजत १९. वटी २०. वरमाई २१. तप २३. वामन २५. तरट २७. गाणे २९. लकब ३१. खस ३४. जीव ३५. साने ३६. वावटळ ३७. सुरेल ३८. गाडीवान ३९. कमला ४०. वासरू ४२. गेंडा ४३. दरी ४४. बाज ४५. लहर ४७. ढीग ४९. गोंद ५१. भार्या ५२. दोंद ५३. अप्रिय ५४. अनुजा ५५. वक्ता ५६. प्रथा ५८. सवय ५९. अघोरी ६०. गर्दी ६१. मामा ६२. रण ६३. कवळ ६४. दरसाल ६५. श्रीगणेशा ६७. वंशज ६९. गणेश ७१. काका ७३. कटी ७४. याग ७५. कवायत ७७. परसदार ८०. सन ८२. खेटर ८३. कडवा ८४. लागीर ८६. गोतावळा ८७. सत्यवान ८९. नाच ९२. जवाब ९४. कडा ९६. तुषार ९७. चीर ९८. सततचे ९९. महानता १००. कापूर

**उभे शब्द** : १. अर्धांगवात २. रागीट ३. कबुलीजवाब ४. अंबुज ५. सुटसुटीत ६. शौर्य ७. मही ८. दात ठेवणे ९. अलका ११. काटवट १२. वारेमाप १३. राजीखुशीने १८. तम २२. पलटवार २४. नखरेल २६. रणगाडा २७. गावकरी २८. दावा ३०. कळस ३२. सल ३३. नावाडी ३५. सालाबादप्रमाणे ४१. रूढीप्रिय ४२. गेंद ४३. दर्यावर्दी ४६. हट्ट ४८. गय ४९. गोंडा घोळणे ५०. अनुकरणीय ५३. अवकाशयान ५७. आरसा कशाला ५९. अवगत ६०. गलका ६१. मागमूस ६६. शाहीर ६८. जग ७०. शकट ७२. कापड ७६. वारस ७८. रवाना ७९. दारा ८०. सरवा ८१. चिंताक्रांत ८२. खेळाडू ८३. कनक ८५. गीजर ८८. त्यजन ९०. चतुर ९१. पुरण ९३. बस ९५. डाका

# गदिमांचे घर 'पंचवटी' पाडणार नातवाची नातेवाईकांविरूद्ध तक्रार

पान १ वरून

पोस्ट टाकून आपली बदनामी सुरू केली आहे,असा आरोपही सुमित्र माडगुळकर यांनी केला. आम्ही ग दि मा यांचे स्मारक पुण्यात असावे यासाठी प्रयत्न केले , जनतेने त्यासाठी निधी दिला , त्या स्मारकाची भिंत उभी राहिली आहे. असे असताना त्यांचेच नातेवाईक त्यांची पंचवटी विकायला निघाले आहेत.

## तेव्हा तू कुठे होतास? सुमित्र श्रीधर माडगूळकर

१) जेव्हा पंचवटीला रंग द्यायला हवा होता तेव्हा बाबांना पैसे तर दिले नाहीसच पण विरोधच केलास. तेव्हा तुला असे वाटले नाही का की आपलेही काही कर्तव्य आहे.
२) पंचवटीचा पुढचा भाग पडायला आला होता तेव्हा बाबांनी आणि काकांनीच तो दुरुस्त केला होता.
३) अजूनही पंचवटीच्या अंगण झाडण्याचे आणि रक्षणाचे काम करण्याचे पैसे मी आणि काकू देतो
४) पंचवटीसाठी बिल्डर बघायला तूच पुढे होतांस. जेव्हा तुला कळले की बाबांनी will माझ्या नावावर केले आहे तेव्हा तू ५० % तुला हवेत आणि लीनताला जिने तुला वेळोवेळी मदत केली तिला नंतर द्यावेत असे तू सांगितलंस.
५) पंचवटीच्या भिंतींनी कधीही ऐकली नाही अशी अर्वाच्य भाषा तू स्वत:च्या आईला, बहिणीला आणि मेव्हण्याला वापरलीस की ज्यांनी तुला तुझ्या अडचणीच्या काळात मदत केली.
६) बाळा, आता तरी सुधार. खोटे वागण्याचे बंद कर. अजून वेळ गेलेली नाही. शेवटी सत्याचा विजय होतो आणि प्रत्येकाला आपल्या कर्माचे फळ भोगायला लागते हे लक्षात असू दे.
७) आज पैशाच्या लोभाने तू आपली माणसे दूर करत आहेस. पण हीच माणसे तुझ्या प्रत्येक अडचणीला उभी राहिली आहेत हे कायम लक्षात ठेव. जेव्हा तुझ्या हे लक्षात येईल तेव्हा खूप उशीर झाला असेल. वेळीच सावर.
८) आत्ता तुझ्या चुकीच्या वागण्याचे समर्थन तू पंचवटीच्या पाडण्याच्या पोस्टने केले आहेस. लोकांच्या गदिमांविषयीच्या प्रेमाचा, आदराचा गैरफायदा घेण्याचा तुझा हा प्रयत्न चुकीचा आहे.
९) गदिमांच्या आणि रामरायाच्या खालच्या हॉलमधल्या फोटोसमोरच्या टेबलवर, बाहेर जाताना पादत्राणे ठेवताना आपल्या आजोबांच्या थोरपणाची जाणीव कुठे जाते? कोणी पाहुणे आले की आम्हाला उचलून ठेवायला लागतात.
१०) जेव्हा ड्रेनेज नको त्या वस्तू टाकल्यामुळे तुंबते, पाणी तुळशीकट्ट्यापर्यंत जाते ते तुला कधीच दिसत नाही. मी आणि काकूच ते उभे राहून करून घेतो.
११) नामुष्कीची वेळ तुझ्या वागण्यामुळेच माझ्यावर आली आणि तो घाणेरडा आरोप तू माझ्यावर करतोस याला काय म्हणू?

असो. परमेश्वर सारे बघत असतो आणि सत्याचा विजय होतो असा माझा विश्वास आहे. तुला लिहिलेली ही शेवटची पोस्ट!

**तुझी दुर्दैवी आई**

# अमेरिकेने इराणचा प्रस्ताव फेटाळला

पान १ वरून

सागरी सुरक्षा सुनिश्चित करणे, इराणवरील निर्बंध हटवणे व अणु कार्यक्रमावर चर्चा करणे असे मुद्दे होते. मात्र त्यात अणु कार्यक्रम थांबवण्याबद्दल किंवा समृध्द युरेनियम अमेरिकेच्या स्वाधीन करण्याबाबत एका शब्दाचाही उल्लेख इराणने केला नव्हता. त्यामुळे ट्रम्प यांनी हा प्रस्ताव फेटाळले, असे सांगण्यात आले. इराण आपला अणु कार्यक्रम आणि समृध्द युरेनियमवर तडजोड करण्यास मुळीच तयार नाही. त्यामुळे संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारे हे युध्द नजीकच्या भविष्यात थांबण्याची चिन्हे धुसर झाली आहेत.

# कॉलर ट्यूनसाठी परवाना आवश्यक कोलकाता उच्च न्यायालयाचा निर्णय

■ नवी दिल्ली

**वोडाफोन** आयडिया कंपनीला केवळ साउंड रेकॉर्डिंग कंपन्यांशी केलेल्या कराराच्या आधारावर गाणी कॉलर ट्यून किंवा रिंगटोन म्हणून वापरता येणार नाहीत. यासाठी कंपनीला इंडियन परफॉर्मिंग राइट सोसायटी लिमिटेड कडूनही परवानगी घ्यावी लागेल, असा महत्त्वपूर्ण निर्णय कोलकाता हायकोर्टाने दिला आहे.

न्यायमूर्ती देबांगसू बसाक आणि मोहम्मद शब्बार रशीदी यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, गाण्यांमधील संगीत आणि गीतांचे स्वतंत्र हक्क असतात आणि त्यांचा व्यावसायिक वापर करण्यासाठी इंडियन परफॉर्मिंग राइट सोसायटी लिमिटेडची परवानगी आवश्यक आहे. न्यायालयाने म्हटले की, सारेगमा इंडिया लिमिटेडकडे केवळ साउंड रेकॉर्डिंगचे अधिकार आहेत. त्यामुळे मूळ संगीत आणि गीतांच्या वापरासाठी परवाना देण्याचा अधिकार कंपनीकडे नाही.आयपीआरएसची स्पष्ट परवानगी घेतल्याशिवाय वोडाफोनला गाण्यांचा व्यावसायिक वापर करता येणार नाही. ही सुनावणी



वोडाफोनच्या व्हॅल्यू-ॲडेड सर्व्हिसेसशी संबंधित होती. या सेवेद्वारे ग्राहकांना चित्रपट आणि बिगर-चित्रपट गाणी कॉलर ट्यून व रिंगटोन म्हणून वापरण्याची सुविधा दिली जाते.

# बीड नगरपालिकेत मुख्याधिकाऱ्यांना केबिनमध्ये घुसून जीवे मारण्याची धमकी

■ बीड

**बीड** नगरपालिकेत मुख्याधिकारी शैलेश फडसे यांना त्यांच्या केबिनमध्ये घुसून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या घटनेमुळे पालिकेतील कर्मचाऱ्यांमध्ये भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शैलेश फडसे हे आपल्या दालनात काम करत असताना एक व्यक्ती तिथे आली. व्यावसायिक कर पावती (पीटीआर) नोंदणीच्या कारणावरून या व्यक्तीने मुख्याधिकाऱ्यांवर दबाव टाकण्यास सुरुवात केली. सुरुवातीला चर्चा सुरू असतानाच संबंधित व्यक्तीने अरेरावी करत शिवीगाळ केली व थेट जीवे मारण्याची धमकी दिली. हा संपूर्ण प्रकार कार्यालयातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. घटनेदरम्यान काही कर्मचारी तत्काळ पुढे सरसावल्यामुळे मोठा अनर्थ टळला. कर्मचाऱ्यांनी संबंधित व्यक्तीला अटकाव करत परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेनंतर पालिकेतील कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली. दोषी व्यक्तीवर तात्काळ गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन पुकारत पालिकेसमोर ठिय्या आंदोलन केले. दरम्यान, या प्रकरणाबाबत पोलीस अधीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांनी माहिती देताना सांगितले की, मुख्याधिकाऱ्यांकडून तक्रार प्राप्त झाली.

# निदाला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी मतीन पटेलचे नगरसेवकपद धोक्यात

पान १ वरून

तरुणीच्या घरी जाऊन धार्मिक विधी करत असल्याची आणि विशिष्ट धर्माशी संबंधित प्रार्थना, पोशाख आणि धार्मिक पद्धती स्वीकारण्यासाठी दबाव टाकल्याची माहिती आहे. तिने पीडितेला धार्मिक विषयांशी संबंधित तब्बल १७१ लिंक पाठवल्याचे तपासात उघड झाले आहे. धार्मिक व्हिडिओ आणि ऑनलाइन सामग्रीच्या माध्यमातून मतपरिवर्तनाचा प्रयत्न झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला. या लिंक कुठून आणि कोणाकडून पाठवल्या, याचा तपास एसआयटी करत आहे.या प्रकरणात लैंगिक शोषण, विनयभंग,



धार्मिक भावना दुखावणे आणि सक्तीच्या धर्मांतराचे प्रयत्न अशा गंभीर आरोपांखाली आतापर्यंत नऊ गुन्हे दाखल आहेत.

या प्रकरणात निदा खानला आश्रय दिल्याचा आरोप असलेल्या मतीन पटेलच्याही अडचणी वाढल्या आहेत. संभाजीनगर पालिकेने त्यांच्या नारेगाव येथील निवासस्थान आणि कार्यालयाला अनधिकृत बांधकामप्रकरणी नोटीस बजावली आहे. महापौर समीर राजूरकर यांनी मतीन पटेल यांचे नगरसेवक पद रद्द करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती दिली. मात्र, विरोधी पक्षनेत्यांनी भूमिकेला विरोध करत नगरसेवकांना जनतेने निवडून दिले असल्याने त्यांचे पद रद्द करण्याचा अधिकार महापौरांना नसल्याचे स्पष्ट केले.

# देवस्थान जमिनीची मालक पुजारी, वहिवाटदार, मिरासदार

पान ८ वरून

आहेत. प्रस्तावित कायद्यानुसार देवस्थानच्या जमिनी खालसा करून त्या संबंधित पुजारी, वहिवाटदार किंवा मिरासदार यांच्या नावावर करण्यात येणार आहेत. त्यासाठी रेडी रेकनरनुसार मूल्य आकारले जाणार आहे. ती रक्कम संबंधित देवस्थानांना दिली जाईल. तसेच गावठाणातील घरांसाठी वापरल्या जाणाऱ्या देवस्थान जमिनी मोफत मालकी हक्काने देण्याची तरतूद आहे. मात्र जमीन धारण मर्यादेपेक्षा जास्त जमीन असल्यास ती सरकारजमा केली जाणार आहे.

बेकायदेशीर कब्जा केलेल्या जमिनी परत घेण्याची तरतूदही करण्यात आली आहे. १ जानेवारी २०११ पूर्वीचे अतिक्रमण काही अटींवर नियमित करता येईल. मात्र फसवणूक करून जमीन हडप केल्याचे सिद्ध झाल्यास दोन ते पाच वर्षे कारावास आणि बाजारभावाएवढा दंड अशी कठोर शिक्षा प्रस्तावित आहे. या निर्णयामुळे राज्यातील दीर्घकालीन जमिनीचे वाद मिटण्यास मदत होईल आणि संबंधित धारकांना कायदेशीर हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**TENDER NOTICE**

Sealed Item Rate tenders are Invited from Qualified & Reputed Civil Contractors for Structural Treatment, Civil, Terrace Waterproofing Treatment, Patch Plumbing, Painting & Allied Works of

**"RUSTOMJEE EVERSHINE "J" AVENUE BLDG. NO. 49 TO 52" CO-OP. SOC.LTD.**

Survey No. 5, 5B,5D,5F, Village Dongre (Narangi), Rustomjee Evershine Global City, Avenue – J, Virar (W), Dist. Palghar – 401 303.

Issue from Society Office: - **12/05/2026** to **18/05/2026** between 11:00am to 02:00pm

Date of Submission: - **19/05/2026** between 11:00am to 2:00pm in Society Office.

Tender Document Cost **Rs. 4000/-** (In Cash Non-Refundable)

WISE ENGINEERING CONSULTANTS

**WISE ENGINEERING CONSULTANTS**
**ISO CERTIFIED**
**Tel- 022 4616 7889 / 7757856884 / 9987001609.**

# भाजपाचे काही उमेदवार 'एसआयआर'मुळे जिंकले

पान १ वरून

मतदारसंघांमधील भाजपाच्या विजयी उमेदवारांची यादी सादर केली. या मतदारसंघांमध्ये तृणमूलच्या उमेदवाराचा जेवढ्या मतांनी पराभव झाला आहे त्याहून अधिक मते त्या त्या मतदारसंघात एसआयआरच्या माध्यमातून वगळण्यात आली आहेत, असे बॅनर्जी यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तृणमुलच्या एका उमेदवाराचा अवघ्या ८६२ मतांनी पराभव झाला. तर मतदारसंघातील वगळलेल्या मतदारांची संख्या ५,४३२ आहे, असेही बॅनर्जी यांनी दाखवून दिले. तृणमूल आणि भाजपाच्या मतांमध्ये ३२ लाख मतांचा फरक आहे आणि ३५ लाख मतदारांचे अर्ज अपीलीय लवादाकडे प्रलंबित आहेत, याकडेही बॅनर्जी यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले.

# २०० कोटींच्या मनी लाँडरिंगमध्ये अभिनेत्री जॅकलीनही सहभागी आहे

पान १ वरून

किरकोळ भूमिका नाही,ती या गुन्ह्यातून झालेल्या कमाईची मोठी लाभार्थी आहे. तिचा या गैरव्यवहारात सक्रिय सहभाग होता, असा युक्तिवाद करून ईडीच्या वकिलांनी तिला माफीचा साक्षीदार करून घेण्यास विरोध केला.

सुकेश चंद्रशेखर याचा गुन्हा उघड झाल्यानंतरदेखील जॅकलीन त्याच्या नियमित संपर्कात होती.त्यामुळे तिला या प्रकरणात माफीचा साक्षीदार करणे न्यायाच्या नैसर्गिक तत्वाच्या विरोधी ठरेल. आरोपीने केलेल्या गुन्ह्याची तीव्रता दुर्लक्षित केल्यासारखे होईल, असे ईडीच्या वकिलांनी सांगितले.

ईडीच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने जॅकलीन फर्नांडिसला त्यावर आपली भूमिका मांडण्यास सांगितले असून पुढील सुनावणी उद्या १२ मे रोजी आहे.

**फॉर्म ए**
**जाहीर घोषणा**

(इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया संहिता २०१६ नियम १०२ अन्वये)
**लॅण्डमार्क मोटेल्स ॲण्ड ट्रॅव्हल्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामिनदार श्री. कोप्पारा गुल हुसेन सैतच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| | | |
|---|---|---|
| १ | वैयक्तिक जामीनदाराचे नाव | कोप्पारा गुल हुसेन सैत |
| २. | वैयक्तिक जामीनदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि (असल्यास) मुख्य कार्यालयाचा पत्ता | ३०४, पॅराडाईज हाइट्स, मिल्लत नगर मशिदीजवळ, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई- ४०००५३ |
| ३. | वैयक्तिक जामीनदाराच्या संदर्भात दिवाळखोरी प्रारंभ दिनांक | ०७.०५.२०२६ |
| ४. | अर्जाचा स्वीकार करणाऱ्या आदेशाचा तपशील | एनसीएलटी, मुंबई खंडपीठाने दिनांक ७.५.२०२६ रोजी पारित केलेला आदेश; प्रकरण क्र.: सी.पी. (आयबी)/५१५ (एमबी) २०२४ मध्ये आयए २१४२/२०२५ |
| ५. | दिवाळखोरी निवारण व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | मृदुला क्लेटस ब्रॉडी IBBI/IPA-001/IP/P-01702/2019-2020/12681 |
| ६. | मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या दिवाळखोरी निवारण व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ता: कार्यालय क्र. ए-४०३, सिल्वर इस्टेट अपार्टमेंट, रघुकुल क्रिएशन, मनीष नगर, नागपूर-४४००१५ ईमेल आयडी: camrudulkejdiwal@gmail.com |
| ७. | दिवाळखोरी निवारण व्यावसायिकाशी पत्रव्यवहारासाठी वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ता: कार्यालय क्र. ए-४०३, सिल्वर इस्टेट अपार्टमेंट, रघुकुल क्रिएशन, मनीष नगर, नागपूर-४४००१५ ईमेल आयडी: pgirpkoppara@gmail.com |
| ८. | दावे सादर करण्याची शेवटची तारीख | ०१.०६.२०२६ (या जाहिरातीपासून २१ दिवसांचा कालावधी) |
| ९. | संबंधित फॉर्म | **वेबलिंक:** https://ibbi.gov.in/en/home/downloads |

येथे सूचना देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने लॅण्डमार्क मोटेल्स ॲण्ड ट्रॅव्हल्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामिनदार श्री. कोप्पारा गुल हुसेन सैत यांच्या कॉर्पोरेट दिवाळखोरी निवारण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिनांक ०७.०५.२०२६ रोजी दिले आहेत.

श्री. कोप्पारा गुल हुसेन सैत यांचे धनकोंना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या दाव्यांचे पुराव्यासह तपशील दिनांक ०१.०६.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी, अनुक्रमांक ७ समोरील पत्त्यावर दिवाळखोरी निवारण व्यावसायिक यांच्याकडे सादर करावेत. खोटे किंवा दिशाभूल करणारे दावे अथवा पुरावे सादर केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**दिनांक: १२.०५.२०२६**
**ठिकाण : नागपूर**

**मृदुला क्लेटस ब्रॉडी**
**ठराव व्यावसायिक**
**नोंदणी क्रमांक:** IBBI/IPA-001/IP/P-01702/2019-2020/12681

**एमपीटी (एल) क्र. ५९२० वर्ष २०२६**
**मुंबई उच्च न्यायालयामध्ये**
**मृत्युपत्रविषयक आणि मृत्युपत्ररहित अधिकारक्षेत्र संकीर्ण याचिका (एल)**
**क्र. ५९२०/२०२६**

बॉम्बे विनियमन VIII वर्ष १८२७ च्या कलम २ अन्वये,
दिवंगत **कल्पना विष्णू तारी,**
हिंदू, मुंबई येथील भारतीय निवासी, विवाहित, पेशाः गृहिणी, मृत्युसमयी राहणार - खोली क्र. २०२, २रा मजला, इमारत क्र. टी-६७, प्रतिक्षा नगर, सायन, मुंबई ४०००२२ ... दिवंगत यांच्या कायदेशीर वारसाहक्क प्रमाणपत्र पारित करण्याच्या प्रकरणामध्ये,
**धनंजय विष्णू तारी**
वय ४७ वर्षे, हिंदू, मुंबई येथील भारतीय निवासी, पेशाः नोकरी, निवासी पत्ता - खोली क्र. २०३, इमारत क्र. टी-६७, प्रतिक्षा नगर, सायन कोळीवाडा, सायन, मुंबई ४०००२२
उपरोल्लेखित दिवंगत व्यक्तीचा मुलगा म्हणून
... याचिकाकर्ता

**उद्घोषणा**

प्रति,
**१. रुपाली विष्णू तारी**
खोली क्र. २०३, इमारत क्र. टी-६७, प्रतिक्षा नगर, सायन कोळीवाडा, सायन, मुंबई ४०००२२

नोंद घ्यावी की, उपरोल्लेखित याचिकाकर्ता यांनी दि. १७ फेब्रुवारी, २०२६ रोजी इतर बाबींसोबतच, खालील अनुतोषांकरिता विनंती करणारी वरील याचिका सदर माननीय न्यायालयामध्ये सादर केली होतीः

अ. याचिकाकर्त्यास म्हणजेच **(१) धनंजय विष्णू तारी** आणि सदर दिवंगत व्यक्तीचे इतर कायदेशीर वारस म्हणजेच **(२) नेहा ज्ञानेश्वर वाडेकर, (३) अश्विनी अविनाश तारकर आणि (४) विष्णू शंकर तारी, (५) रुपाली विष्णू तारी** यांना दिवंगत स्वर्गीय **कल्पना विष्णू तारी** यांचे केवळ कायदेशीर वारस घोषित करणारे आणि विद्यमान याचिकेच्या एक्झिबिट "ई" मधील अनुसूची -। मध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या खोली/मालमत्तेच्या संदर्भात दिवंगत व्यक्तीच्या भाडेपट्टी हक्कांचे हक्क देणारे, बॉम्बे विनियमन VIII वर्ष १८२७ च्या परिशिष्टाच्या स्वरुपात कायदेशीर वारसाहक्क प्रमाणपत्र मंजूर करणे.

ब. प्रकरणाचे स्वरुप आणि परिस्थितीस आवश्यक असतील, असे आणखी व इतर अनुतोष प्रदान करणे.

**आणि नोंद घ्यावी की,** वरील संकीर्ण याचिका (एल) क्र. ५९२०/२०२६ माननीय श्री. न्यायाधीश मिलिंद एन. जाधव पीठासीन असलेल्या न्यायालयासमक्ष दि. २४ एप्रिल, २०२६ रोजी सुनावणीकरिता आली आहे, जेव्हा उद्घोषणा जारी करण्याबाबतचा आदेश पारित झाला आहे आणि सदर याचिका १२ जून २०२६ रोजी सुनावणीस घेण्यायोग्य करण्यात आली आहे.

**आणि पुढे नोंद घ्यावी की,** सदर याचिकेची सुनावणी माननीय श्री. न्यायाधीश मिलिंद एन. जाधव पीठासीन असलेल्या न्यायालयात, न्यायालय कक्ष क्र. ३४, १ला मजला, उच्च न्यायालय मुख्य इमारत, उच्च न्यायालय, मुंबई येथे किंवा अशी प्रकरणांची सुनावणी घेणाऱ्या माननीय न्यायाधीशांसमक्ष दि. १२ जून, २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. निश्चित करण्यात आली आहे, जेव्हा तुम्ही एकतर व्यक्तिशः किंवा सदर माननीय न्यायालयामध्ये वकिली करणाऱ्या ॲडव्होकेटद्वारे उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**आणि पुढे नोंद घ्यावी की,** तुमच्या वतीने एकतर व्यक्तिशः किंवा योग्यरित्या अधिकृत आणि सूचना दिलेल्या या माननीय न्यायालयाच्या ॲडव्होकेटद्वारे उपस्थिती न दर्शविल्यास, तुमच्या अनुपस्थितीमध्ये सुनावणी आणि निश्चिती करण्यात येईल आणि याचीही नोंद घ्यावी की, सदर प्रकरण पुढील दिनांकास तहकूब करण्यात आल्यास सदर माननीय न्यायालयाद्वारे निर्देश दिल्यास आणि देईपर्यंत पुढील सूचना देण्यात येणार नाही.

"तुम्हाला याद्वारे सूचित करण्यात येते की, तुम्हाला राज्य कायदे सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय कायदे सेवा समित्या, जिल्हा कायदे सेवा प्राधिकरण, आणि तालुका कायदे सेवा समित्यांकडून पात्रता निकषानुसार मोफत कायदे सेवा उपलब्ध आहेत आणि जर तुम्ही पात्र असल्यास आणि मोफत कायदे सेवा प्राप्त करण्यास इच्छुक असल्यास, तुम्ही वरील कायदे सेवा प्राधिकरण/समित्यांना संपर्क करावा."

साक्षीदार, श्री. श्री चंद्रशेखर, मुख्य न्यायाधीश, मुंबई, दि. ६ मे, २०२६.

न्यायालयाद्वारे,
प्रोथोनोटरी आणि सीनियर मास्टर करिता
शिक्केदार उच्च न्यायालय मुंबई

शिक्का

दिनांक ६ मे, २०२६
**उत्तम एस राणे**
**याचिकाकर्त्यांकरिता ॲडव्होकेट्स**
**१२४, ग्रेट वेस्टर्न बिल्डींग, २३, चेंबर्स ऑफ कॉमर्स लेन, फोर्ट, मुंबई ४०००२३.**

नवाकाळ

• पुणे । मंगळवार १२ मे, २०२६ • पान -८

# पोखरण अणुचाचणीच्या वेळी भारताला झुकवता आले नाही

## पंतप्रधान मोदींचे वक्तव्य



■ वेरावळ

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ मंदिराच्या ऐतिहासिक अमृत महोत्सवात महापूजा आणि जलाभिषेक केल्यानंतर रिमोटच्या सहाय्याने मंदिराच्या कलशाचा ११ तीर्थक्षेत्रांच्या पवित्र जलाने अभिषेक केला. यावेळी पोखरण २ अणुचाचणीचा उल्लेख करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, जगातील अनेक शक्तींनी भारताचा विरोध केला. आर्थिक संकट निर्माण करून भारताचे सर्व मार्ग बंद करण्याचा प्रयत्न झाला. मात्र, त्या वेळी देशाचे नेतृत्व अटल बिहारी वाजपेयी यांच्या हातात होते आणि कोणालाही भारताला झुकवता आले नाही. शक्तीसोबत शिवाचा संबंध जोडला जाणे अत्यंत आनंददायी असल्याचे सांगत त्यांनी अणुचाचणीला 'ऑपरेशन शक्ती' आणि चंद्रयान-३ मोहिमेतील स्थळाला 'शिवशक्ती' असे नाव देण्यात आल्याचे नमूद केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू सरकारने देशाच्या स्वाभिमानाशी संबंधित प्रतीकांकडे दुर्लक्ष केले. सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धारालाही याचा फटका बसला होता. मात्र, देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद आणि तत्कालीन उपपंतप्रधान व गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रयत्नांमुळे ७५ वर्षांपूर्वी मंदिराचे पुनर्निर्माण करण्यात आले. यामुळे अनेक शतकांपासूनचा कलंक दूर झाला. याआधी पंतप्रधान जामनगरहून सोमनाथ येथील वायुदलाच्या हेलिपॅडवर उतरले आणि रोड शो करत मंदिर परिसरात पोहोचले.

# पासपोर्ट न लागणारा मराठी माणूस!

**इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिचे निधन झाल्यावर एक बातमी सारखी फिरत होती तिला परदेशात प्रवास करण्यासाठी पारपत्राची (पासपोर्ट) गरज नसते, त्याशिवाय ती प्रवास करू शकते! पण ब्रिटिशकाळात असा एक मराठी माणूस होता ज्याच्याजवळ पारपत्र नसेल तरी त्याला बिनधास्त परदेशात प्रवास करता यायचा, अगदी कुठेही त्याचे अडायचे नाही - ही बाब आपल्याला माहीत नाही. खरेतर ह्या विषयावर तेव्हाच लिहायचे होते पण केले नाही मी! ११ मे रोजी त्यांची पुण्यतिथी होती.**



**हा माणूस** तसा जन्माला आला तो एकापेक्षा एक थोर व्यक्ती ज्या कुटुंबात प्रत्येक पिढीत जन्माला आल्या त्या! होय या माणसाचे नाव रघुनाथ पुरुषोत्तम उपाख्य रँग्लर परांजपे! स्त्रियांना शिक्षणाची दारे उघडून देणाऱ्या आणि लाखो कुटुंबांचा मायबाप अन्नदाता असणाऱ्या महर्षी कर्वे ह्यांचे हे आतेभाऊ!

खरेतर हे कुटुंब चित्पावन ब्राह्मण! परा आणि अपरा जप असे जपाचे दोन प्रकार आहेत. यापैकी परा जप करणारे ते परांजपे! आता रँग्लर परांजपे ह्यांनीच आपल्या चरित्रात लिहिले आहे की आम्ही पारायण करणारे म्हणून पारायणजपे आणि म्हणून परांजपे! सगळ्यांनी तेच उचलले आहे. पण नाही. ते बरोबर नाही. परा जप करणारे ते परांजपे!

पण हे परांजपे अत्यंत पुढारलेले होते, देव वगैरे काहीही मानत नव्हते. नास्तिक होते. एवढेच कशाला तर प्रत्येक उपवासाच्या दिवशी विशेषत : एकादशीला दाण्याचे कूट घालून ते आणि त्यांची पत्नी बाळीबाई (डॉ. आनंदीबाई गोपाळ जोशी ह्यांची ही पुतणी) मटण शिजवित आणि त्याचा आस्वाद घेत असत.

रँग्लर परांजपे ह्यांची आपल्याला ओळख आहे ती म्हणजे ते फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य असताना विदेशी कापडाची भारतातील पहिली होळी करणाऱ्या विनायक दामोदर सावरकर ह्याला त्याबद्दल दंड करणारे म्हणून! ह्याच कार्यात



सावरकरांना मदत करणारे होते प्रख्यात नेते प्रकाश आंबेडकर ह्यांचे चुलत सासरे (सौ. अंजलीताई आंबेडकर ह्यांचे काका व युवा नेते सुजातदादा आंबेडकर ह्यांचे काका आजोबा) व प्रख्यात कवी श्री वा. गो. मायदेव! हा दंड मायदेव ह्यांनी भरला होता.

**डॉ. सुबोध नाईक**

तर हे परांजपे साहेब अतिशय ब्रिटिशनिष्ठ होते. त्या काळात रिटायर्ड झाल्यावर सुद्धा ब्रिटिश राज्य लगेचच त्यांची नियुक्ती एखाद्या राज्याचे राज्यपाल वगैरे सरकारी पदांवर म्हणून करेल असे त्यांचे मित्र सुद्धा नेहमी म्हणत. आणि झालेही तसेच!

ते मुंबई प्रांताचे शिक्षणमंत्री वगैरे राहिले आहेत. ब्रिटिश सरकार शिक्षण ह्या विषयात त्यांचा शब्द माने, शेवटचा शब्द असे त्यांचा!

ब्रिटिशांच्या मर्जीतील असल्याने ते अनेकदा विदेश प्रवास करत आणि कित्येकदा पासपोर्ट घरीच विसरत. पण त्यांना कोणीही अडवत नसे. मग ते आपल्या पत्नीला तार करून कळवत आणि शक्य असेल तर ती पाठवे. पण परांजपे साहेबांचे काहीही अडत नसे. जिथे जायचे आणि राहायचे तिथे ते पासपोर्ट नसला तरी बिनधास्त राहू शकत.

राणीसारखा सन्मान ब्रिटिश व मित्रराष्ट्र परांजपे सरांना देत ह्याचे एकमेव कारण त्यांची बुद्धिमत्ता! एवढी बुद्धिमत्ता त्याकाळात कोणत्याही भारतीयाला नव्हती.

भारताचे ऑस्ट्रेलियामधील राजदूत म्हणून सुद्धा ब्रिटिशांनी त्यांचीच नियुक्ती केली होती.

सावरकरांना दंड केला म्हणून लोकमान्य टिळकांनी अग्रलेख लिहिला होता - 'हे आमचे गुरू नव्हेत' पण आपण त्या वादात आपण पडू नये.

ब्रिटिशसुद्धा ज्यांचा मान ठेवत आणि राणीसारखा मान देत त्या बुद्धीला रँग्लर परांजपे ह्यांना वंदन!

# देवस्थान जमिनीचे मालक पुजारी, वहिवाटदार, मिरासदार

■ मुंबई **सरकारचा निर्णय**

**राज्यातील** धार्मिक व धर्मादाय संस्थांकडे असलेल्या देवस्थान इनाम जमिनींबाबत सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील देवस्थानांच्या सुमारे साडेचार लाख हेक्टर जमिनींच्या मालकीत मोठा बदल होणार आहे. ही जमिनी संबंधित पुजारी, वहिवाटदार किंवा मिरासदार यांच्या नावावर करण्यात येणार आहेत.

राजे-महाराजांच्या काळात मंदिरांच्या व्यवस्थापनासाठी मोठ्या प्रमाणात इनाम जमिनी दिल्या होत्या. या जमिनी सध्या पुजारी, वहिवाटदार आणि मिरासदार यांच्या ताब्यात आहेत. अनेक ठिकाणी शेतकरी वर्षानुवर्षे या जमिनी कसत असले तरी त्यांना कायदेशीर मालकी हक्क मिळाला नव्हता, त्यामुळे वाद आणि अनिश्चितता कायम होती. हा प्रश्न सोडवण्यासाठी सरकार 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायदा' आणण्याच्या तयारीत आहे. येत्या पावसाळी अधिवेशनात हे विधेयक मांडले जाणार आहे. महसूल विभागाने त्याच्या प्रारूपावर ५ जूनपर्यंत हरकती व सूचना मागवल्या

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

» पान ७ वर

# शेतकरी कर्जमाफीसाठी कोल्हापुरात मनसेचा मोर्चा

■ कोल्हापूर

**शेतकऱ्यांच्या** सरसकट कर्जमाफीच्या मागणीसाठी मनसेने आक्रमक भूमिका घेत आज कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढला. जिल्हाध्यक्ष राजू दिंडोरले यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा पार पडला. या मोर्चात शेतकरी बैलगाड्या आणि शेती साहित्य घेऊन सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, निवडणुकीपूर्वी सरकारने शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीची घोषणा केली होती. मात्र, दीड ते दोन वर्षांचा कालावधी उलटूनही या घोषणेची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे तात्काळ कर्जमाफी लागू करावी. जर सरकारने येत्या १० ते १५ दिवसांत कर्जमाफी लागू केली नाही, तर आंदोलन अधिक तीव्र केले जाईल.

# विठ्ठल मंदिरातील आलिशान प्रशासकीय कार्यालय हटवले

**परवानग्यांवर प्रश्नचिन्ह**

■ पंढरपूर

**पंढरपूर** येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर येथील सभा मंडपात उभारलेले प्रशासकीय कार्यालय पुरातत्त्व विभागाच्या सूचनेनुसार हटवण्यात आले. या प्रकरणावरून मंदिर प्रशासनाने हे बांधकाम करताना आवश्यक परवानग्या घेतल्या होत्या का, असा सवाल उपस्थित होत आहे.

काही वर्षांपूर्वी तत्कालीन परिस्थितीत एका देणगीदाराच्या मदतीतून विठ्ठल मंदिराच्या सभा मंडपात अधिकाऱ्यांसाठी प्रशासकीय कार्यालय उभारले होते. मंदिरातील कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकांसाठी तयार केलेले हे कार्यालय अत्याधुनिक स्वरूपाचे होते. मात्र, आता पुरातत्त्व विभागाने मंदिराच्या पुरातन रचनेला बाधा पोहोचत असल्याचे निरीक्षण नोंदवल्यानंतर हे कार्यालय हटवण्यात आले. या कारवाईतून मंदिरातील जुन्या पद्धतीच्या पारंपरिक रचना पुन्हा मूळ स्वरूपात आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. अवघ्या तीन वर्षांपूर्वी या कार्यालयासाठी सुमारे ५० लाख रुपये खर्चून आलिशान फर्निचर उभारले होते. हे फर्निचर एका देणगीदाराने दिलेल्या निधीतून तयार केल्याची माहिती आहे. मात्र, मंदिर समितीने अद्याप त्या देणगीदाराचे नाव जाहीर केलेले नाही. तसेच कार्यालय उभारताना आणि फर्निचर बसवताना पुरातत्त्व विभाग अथवा संबंधित यंत्रणांची अधिकृत परवानगी घेण्यात आली होती का, याबाबतही स्पष्टता नसल्याने संशय व्यक्त केला जात आहे.

# ५ वर्षांत घरगुती वीज २६ टक्क्यांनी स्वस्त होणार! फडणवीसांची माहिती

■ मुंबई

**२०२५ ते २०३०** या काळासाठीचा काही वर्षांचा वीजदर मंजूर झाला आहे. पूर्वी दरवर्षी विजेचे दर ९ टक्क्यांनी वाढायचे. मात्र, आता नवीन धोरणानुसार उद्योगांसाठी दरवर्षी वीज दरात २ ते ३ टक्के कपात होणार आहे. घरगुती वापरासाठी येत्या पाच वर्षांत वीज दरात तब्बल २६ टक्क्यांनी कपात होणार आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील उद्योग अधिक स्पर्धात्मक होतील व सर्वसामान्यांच्या खिशावरील भारही कमी होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी बनवण्याच्या दिशेने सरकार वेगाने पावले उचलत असून, त्याचा मोठा फायदा सर्वसामान्यांना मिळणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. आज सीआयआयच्या वार्षिक बैठक झाली त्यावेळी फडणवीस हजर होते. इंधन बचतीच्या मुद्यावरून पंतप्रधान मोदींवर टीका करणाऱ्या राहुल गांधींचा 'रिजेक्टेड माल' असा उल्लेख केला. ते म्हणाले की भविष्यात काय चित्र असेल या संकल्पनेवर आधारित असलेल्या सीआयआय बिझनेस समिटमध्ये मी महाराष्ट्राच्या प्रगतीचा अहवाल सादर केला.

# बंगालमधील सुवेंदू अधिकारी यांच्या पीए हत्याकांडात ३ संशयित अटकेत

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालमधील विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांचे वैयक्तिक सहाय्यक चंद्रनाथ रथ यांच्या हत्येप्रकरणी बिहार आणि उत्तर प्रदेशातून तीन संशयितांना अटक करण्यात आली आहे. तिघांनाही पश्चिम बंगालमध्ये आणण्यात आले आहे. बंगाल सीआयडीने दिलेल्या माहितीनुसार, बिहारमधील बक्सर येथून मयंक राज मिश्रा व विक्की मौर्य, तर उत्तर प्रदेशातील बलिया येथून राज सिंह याला रविवारी रात्री ताब्यात घेण्यात आले. आज सकाळी त्यांना औपचारिक अटक करण्यात आली. राज सिंह हा शार्प शूटर असल्याचे सांगितले जात आहे. बंगाल विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर दोन दिवसांनी, ६ मे रोजी ४२ वर्षीय चंद्रनाथ रथ यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती.

# बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणी सुरक्षारक्षक बडतर्फ

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणी सुरक्षेत हलगर्जीपणा झाल्याची माहिती मिळाल्यानंतर मुंबई पोलिसांनी कारवाई केली. हल्ल्यावेळी सुरक्षा ड्युटीवर तैनात असलेले पोलीस हवालदार श्याम मगन सोनवणे यांना सेवेतून बडतर्फ केले. कर्तव्यात कसूर आणि निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवत अतिरिक्त पोलीस आयुक्त (संरक्षण आणि सुरक्षा) कार्यालयाने हा निर्णय घेतला. १२ ऑक्टोबर २०२४ रोजी वांद्रे पूर्व परिसरात बाबा सिद्दीकी यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला होता. त्यावेळी श्याम सोनवणे हे त्यांचे अंगरक्षक म्हणून सोबत होते. घटनेनंतर अवघ्या सहा दिवसांत, म्हणजे १८ ऑक्टोबर २०२४ रोजी त्यांना निलंबित केले होते. त्यानंतर विभागीय चौकशी सुरू झाली. चौकशीदरम्यान सुरक्षा प्रोटोकॉलचे पालन करण्यात त्रुटी आढळल्याने सप्टेंबर २०२५ मध्ये सोनवणे यांना बडतर्फीची नोटीस बजावली होती.

# राजकीय वास्तवाचे भान ठेवावे तटकरेंचा जय पवारांना सल्ला



■ मुंबई

**दिवंगत** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना मुख्यमंत्री करण्याच्या विधानावरून राजकीय वाद रंगला आहे. अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी जय पवार यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना राजकीय वास्तवाचे भान राखण्याचा सल्ला दिला.

काही दिवसांपूर्वी अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांनी सुनेत्रा पवार यांनी भविष्यात मुख्यमंत्री व्हावे, अशी इच्छा व्यक्त केली होती. बारामतीतून २०२९ च्या निवडणुकीत सुनेत्रा पवार उमेदवारी करतील आणि त्यांनीच मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळावी. अशी अपेक्षा त्यांनी बोलून दाखवली होती. त्यांच्या या विधानानंतर राज्यातील राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते.

यावर भाष्य करताना सुनील तटकरे म्हणाले की, प्रत्येकाला आपल्या मनातील नेतृत्व पुढे यावे असे वाटत असते. जय पवार यांनीही त्या भावनेतूनच हे विधान केले असावे. मात्र, राजकारणात वास्तव आणि सध्याची परिस्थिती लक्षात घेऊनच पक्षाला पुढे जावे लागते. राष्ट्रवादी काँग्रेस सध्या एनडीएसोबत काम करत असून, त्यानुसारच पक्षाची वाटचाल सुरू आहे.

यावर शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार म्हणाले की, २०२९ मध्ये मुख्यमंत्रीपदासाठी प्रयत्न करण्याची इच्छा अजित पवार आणि त्यांच्या समर्थकांमध्ये होती.

# अहिल्यानगरमध्ये भोंदूबाबा अशोक आढावला अटक

■ अहिल्यानगर

**राज्यभर** भोंदूबाबांचे अनेक प्रताप बाहेर येत असतानाच श्रीरामपूर तालुक्यातही एक प्रकार उघडकीस आला आहे. टाकळीभान येथे 'दावल मलिक बाबा'च्या नावाने दरबार भरवणाऱ्या भोंदू मांत्रिक अशोक आढावला पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोटदुखीवर उपचारासाठी आलेल्या एका महिलेला भूतबाधा झाल्याचे सांगून भोंदू अशोकने तिची फसवणूक केली. मागील तीन वर्षांत विविध मांत्रिक विधींच्या नावाखाली तिच्याकडून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण सुमारे १६ लाख रुपयांचा गंडा घातल्याचा आरोप आहे. याच काळात आरोपीने धार्मिक विधीच्या बहाण्याने पीडित महिलेकडे शरीरसुखाची मागणी करत तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केल्याची गंभीर तक्रारही महिलेने केली आहे. या सततच्या त्रासाला कंटाळून अखेर महिलेने श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दाखल केली.

# मोदींवर टीका करणाऱ्या मधू किश्वरना दिलासा नाही! अटकपूर्व जामीन फेटाळला

■ चंदीगड

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्याशी संबंधित कथित बनावट आणि दिशाभूल करणारा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केल्याप्रकरणी लेखिका मधू किश्वर यांना चंदीगड न्यायालयाकडून दिलासा मिळाला नाही. न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला. या प्रकरणात चंदीगड पोलिसांनी मधू किश्वर यांना तपासात सहभागी होण्यासाठी दुसरी नोटीस पाठवली होती. मात्र त्या पोलिसांसमोर हजर न राहता थेट न्यायालयात गेल्या.



याच प्रकरणात हैदराबादमधील हसन मोहिउद्दीन सिद्दीकी याला अटक करण्यात आली आहे. त्याने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर व्हिडिओ रिट्विट केल्याचा आरोप आहे. सध्या तो तुरुंगात असून त्याची जामीन याचिकाही न्यायालयाने फेटाळली आहे. न्यायालयाने सांगितले की, प्रथमदर्शनी या प्रकरणात भारतीय न्याय संहिता आणि आयटी कायद्याची कलमे लागू होतात. घटनात्मक पदावरील व्यक्तीविरोधात मानहानीकारक शब्द वापरून सोशल मीडियावर सनसनाटी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे जबाबदारीशिवाय काहीही पोस्ट करण्याचा अधिकार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# 'व्हीबी-जी राम जी' अभियान १ जुलैपासून देशभर सुरू

**नवी दिल्ली-** केंद्र सरकारने १ जुलैपासून 'विकसित भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण)' म्हणजेच व्हीबी-जी राम जी देशभर लागू करण्याची घोषणा केली आहे. या नव्या योजनेमुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) रद्द होणार असून, त्याऐवजी ही योजना लागू केली जाणार आहे. ग्रामविकास मंत्रालय यांच्या अधिसूचनेनुसार, हा कायदा सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये लागू होईल. या बदलामुळे मजुरांच्या रोजगारावर कोणताही परिणाम होणार नाही आणि संक्रमण प्रक्रिया सुरळीत पार पडेल. ३० जूनपर्यंत मनरेगा अंतर्गत सुरू असलेली सर्व कामे नव्या योजनेतही सुरू राहतील. तसेच, ई-केवायसी पूर्ण असलेली जॉब कार्डे नवीन कार्ड मिळेपर्यंत वैध राहतील. ज्या मजुरांचे ई-केवायसी बाकी आहे, त्यांनाही काम दिले जाईल. नवीन योजनेनुसार ग्रामीण कुटुंबांना वर्षातून १२५ दिवस रोजगाराची हमी दिली जाणार आहे, जी आधी १०० दिवस होती.


# मुंबई पोलीस दलाची मोठी पुनर्रचना

## दोन नवे झोन | ४ पोलीस ठाण्यांना मंजुरी

**मुंबई पोलीस दलाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि नागरिकांना अधिक सुलभ सेवा देण्यासाठी राज्य सरकारने पोलीस आयुक्तालयाच्या रचनेत मोठे बदल केले आहेत. गृह विभागाने काढलेल्या शासन निर्णयानुसार दोन नवीन पोलीस झोन आणि चार नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्यात आली आहे. या पुनर्रचनेनंतर मुंबईत दक्षिण, मध्य, पूर्व, पश्चिम आणि उत्तर असे पाच प्रादेशिक विभाग असतील. झोपडपट्टी बहुल भाग आणि पोलीस ठाण्यांमधील अंतर लक्षात घेऊन ही नवी रचना केली आहे.**

■ मुंबई

**दक्षिण** विभागात आता तीन झोन असतील. नव्या दक्षिण झोन-३ मध्ये मुंबई कोस्टल-१, मुंबई कोस्टल-२, वडाळा आणि शिवडी पोलीस ठाण्यांचा समावेश करण्यात आला आहे. मध्य विभागातही ताडदेव, भायखळा, दादर, माहीम आणि धारावी यांसारख्या ठाण्यांचे पुनर्गठन करून तीन झोन तयार केले आहेत. पूर्व विभागात नवीन झोन-२ तयार केले आहेत. त्यात नेहरूनगर, घाटकोपर, टिळकनगर आणि विक्रोळी भागांचा समावेश आहे. पश्चिम झोन-२ हा सर्वात मोठा झोन ठरला आहे. वांद्रे, अंधेरी, गोरेगाव,



मालाड आणि दहिसर यांसारख्या ठाण्यांचा त्यात समावेश आहे. उत्तर विभागातही नव्या झोन-१ची निर्मिती करण्यात आली आणि उर्वरित झोनचे नामकरण केले आहे.

# पुरुष समाजाची मक्तेदारी घेतली का? सरन्यायाधीश सूर्य कांत यांचा सवाल

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयात एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी याचिकाकर्त्याला चांगलेच धारेवर धरले. हिंदू विवाह कायद्यातील एका तरतुदीला आव्हान देणाऱ्या कायद्याच्या विद्यार्थ्याला न्यायालयाने फटकारत जनहित याचिकांचा गैरवापर टाळण्याचा इशारा दिला.

जितेंद्र सिंह या विद्यार्थ्याने हिंदू विवाह कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिले होते. या तरतुदीनुसार, पतीविरुद्ध पोटगीचा आदेश होऊन एक वर्ष उलटूनही पती-पत्नी एकत्र राहत नसतील, तर पत्नीलाच घटस्फोटासाठी अर्ज करण्याचा विशेष अधिकार मिळतो. ही तरतूद पुरुषांनाही लागू करावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी घेण्यास नकार देत सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जोयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने कठोर भूमिका घेतली. या तरतुदीमुळे तुम्हाला नेमका काय त्रास होतो? संपूर्ण पुरुष समाजाची मक्तेदारी तुम्हीच घेतली आहे का? असा सवाल सरन्यायाधीशांनी केला. न्यायमूर्ती जोयमाल्य बागची यांनी स्पष्ट केले की, संविधानानुसार सरकारला महिला आणि मुलांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार आहे. पूर्ण समानतेची मागणी करायची असेल, तर संविधानात दुरुस्ती करावी लागेल.